# पंढरी संचार

• पंढरपूर • रविवार, ५ जानेवारी २०२५ • किंमत ₹ ४ • पाने : ८

pandharisanchar.com  RNI-MAH-MAR/1499/2000  • वर्ष २९ • अंक - २२५

NO PAIDNEWS NEWSPAPER




मुलींनी सक्षम बनणे ही काळाची गरज आहे - सौ.शितलदेवी मोहिते... PII





तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या विकासासाठी आवश्यक निधीची तरतूद करावी PIII

## मंत्री गिरीश महाजन यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन कामांची केली पाहणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्याचे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज सहकुटुंब श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर व शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सदर कामांची पाहणी करुन, पुरातत्त्व विभाग व संबधित कंत्राटदारानी सदर कामास गती देऊन वेळेत व गुणवत्तापूर्ण करवीत अशा सूचना यावेळी दिल्या तसेच सुरु असलेल्या कामांना उपलब्ध





निधीची माहिती घेवून, उपलब्ध निधीची कमतरता भासल्यास तात्काळ निधीची उपलब्धता शासनस्तरावरुन तात्काळ येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, सोलापूर शहरचे पोलीस आयुक्त एम राजकुमार, उपविभागीय अधिकारी सचिन इतापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता श्री खांडेकर, प्र.तहसीलदार सचिन मुळीक, कार्यकारी अभियंता सोमशेखर हरसुरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती यावेळी दिली.

## At a Glance

### सीना नदी परिसरात ड्रोनच्या घिरट्या!



**माढा :** सीना नदी परिसरात सकाळपासून ड्रोनच्या घिरट्या सुरु आहेत. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून याकडे गांभीर्याने पहावे, अशी मागणी केली जात आहे. ड्रोनद्वारे कशाची टेहाळणी केली जात आहे याचे कोडे उलगडत नाही. त्यामुळे वेगवेगळ्या चर्चा सुरु आहेत. सीना नदीवरील तरटगाव बंधारा, पांडुरंग वस्ती परिसर, पोटेगाव बंधारा व साळुंखे वस्ती परिसरात नागरिकांनी ड्रोनच्या घिरट्या पहिल्या आहेत. काही नागरिकांनी या ड्रोनचे रेकॉर्डिंग केले आहे. कशामुळे हे ड्रोन फिरत आहे हे समजत नसल्याने भीती निर्माण झाली आहे.

### जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात भरती



**सोलापूर :** सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक-टंकलेखकाची अशासकीय दोन पदे मेस्को मार्फत भरावयाची आहेत. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह बुधवार 8 जानेवारी 2025 पुर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद देवदत्त यांनी केले आहे. जिल्ह्यातील माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या रोजगार पटावर नोंद असलेल्या युध्द विधवा, दिवंगत झालेल्या सैनिकांच्या विधवा पत्नी यांना प्राधान्य देण्यात येईल.

### विद्यापीठाचा 10 जानेवारीला 20 वा दीक्षांत समारंभ



**सोलापूर :** केगांव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा 20 वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, दि. 10 जानेवारी 2025 रोजी सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत मैदानात होणार आहे. यावेळी एकूण 15 हजार 291 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. याचबरोबर 71 संशोधक विद्यार्थ्यांना पीएच. डी पदवी तर 57 विद्यार्थ्यांना सुवर्णपदके देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### अडीच हजार वाहने धावली ओव्हरस्पीडने

**सोलापूर :** राष्ट्रीय महामार्गावरून अतिवेगात वाहन चालविणाऱ्यांना आरटीओने चांगलाच दणका दिला आहे. गेल्या आठ महिन्यात वेगमर्यादा ओलांडणाऱ्या दोन हजार 410 वाहनांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून लाखोंचा दंड वसूल करण्यात आला आहे. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर स्पीडगन दाखल झाल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना वाहन चालविताना वेग कमीच ठेवा, नाही तर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

## नवीन वर्षात प्रत्येक पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** विविध कारणामुळे नागरिकांमध्ये भांडण होतात. यानंतर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली जाते. मात्र यानंतर पोलिसांनी कोणती कारवाई केली याची माहिती मिळण्यास अडचण निर्माण होते. तसेच पोलीस ठाण्यात आलेल्या नागरिकांना योग्य न्याय मिळावा म्हणून सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात दर शनिवारी तक्रार निवारण दिन घेण्यात यावा असे आदेश जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांनी दिले आहेत. यामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. दिवसेंदिवस पोलीस ठाण्यामधील तक्रारींची संख्या वाढत आहे. मात्र याची सोडवणूक झाली असल्याचे दिसून येत नाही. पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर



नागरिक पुन्हा पोलीस ठाण्याकडे फिरकत नाहीत. तर काही प्रकरणात पोलीस कारवाई करण्यास टाळाटाळ करतात. यामुळे पोलीस ठाण्यात आलेल्या प्रत्येक तक्रारीचे निवारण होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात दर शनिवारी तक्रार निवारण दिन घेण्यात यावा असे आदेश जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांनी दिले आहेत. शहरात शांतता सुव्यवस्था राहावी व नागरिकांना संरक्षण मिळावे म्हणून पोलीस ठाण्याची स्थापना करण्यात आली आहे. गावात कोणतेही भांडण झाल्यास याची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात येते. यामुळे दिवसेंदिवस पोलीस ठाण्यात तक्रारींची संख्या वाढत आहे. मात्र याची सोडवणूक झाली असल्याचे दिसून येत नाही म्हणून नागरिकांना योग्य न्याय मिळावा यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात दर शनिवारी तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नागरिकांची विविध कामे शासकीय कार्यालयात असल्यामुळे ते या कार्यालयात अर्ज दाखल करतात. मात्र शासकीय अधिकाऱ्याकडून याची दखल घेतली जात नाही. अनेक

» पान ३ वर



## जिल्हाधिकाऱ्यांशी केली सर्वांगीण विकासाबद्दल चर्चा


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सोलापूर शहरातील विविध समस्या बाबत तसेच सोलापूर शहरातील सर्वांगीण विकासाबद्दल सकारात्मक चर्चा केली. यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये प्रामुख्याने शहरातील विविध समस्या मांडण्यात आल्या आहेत.

## अनिलनगर भागात घर जाळण्याचा प्रयत्न; नागरिकात भीतीचे वातावरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** अनिल नगर परिसरातील एका घराच्या दरवाजासमोर अज्ञात व्यक्तींनी आग लावून घर जाण्याचा प्रयत्न केला. मात्र घरातील लोकांनी आरडाओरड केल्यामुळे परिसरातील नागरिकांनी आग आटोक्यात आणली. यामुळे कोणताही अनर्थ घडला नाही. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे . अनिलनगर परिसरात राहणारे नारायण वाडेकर नेहमीप्रमाणे रात्री जेवण करून घरातील सर्वजण झोपी गेले होते. पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास त्यांना घराला कोणीतरी आग लावली असल्याचे जाणवले. यामुळे त्यांनी घरातील इतर सदस्यांना उठविले. सर्वांनी आरडाओरड





करण्यास सुरुवात केली. वाडेकर कुटुंबाचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक मदतीला धावले. त्यांनी घरातील पाणी आणून आग आटोक्यात आणली. यामुळे मोठा अनर्थ घडला. याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात वाडेकर यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे अनिल नगर परिसरात राहणाऱ्या नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जिल्ह्यात तालुका स्तरावरील लोकशाही दिन सुरू करावेत- ग्राहक पंचायतीची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** जिल्ह्यात तालुका स्तरावरील तहसील कार्यालय, पंचायत समिती,तसेच महानगरपालिका, नगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन सुरू करावेत अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने जिल्हाधिकारी यांचेकडे पत्राद्वारे केली असल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली. नागरिकांचे प्रश्न,समस्या,अडचणी स्थानिक पातळीवरच सोडविल्या जाव्यात असे शासनाचे आदेश आहेत. त्यासाठी तालुका स्तरावरील लोकशाही दिन घेण्याचे आदेश आहेत. तथापि प्रत्येक महिन्यात पहिल्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरावरील लोकशाही दिन नियमित सुरू आहे. मात्र सर्वांना जिल्ह्याचे मुख्यालय ठिकाणी उपस्थित राहून आपल्या अडचणी





मांडणे वेळ वआर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही हे लक्षात घेऊनच शासनाने तालुकास्तरावरील लोकशाही दिन सुरू करण्याचे आदेश काढले आहेत. त्याची पूर्व प्रसिद्धी देवून ठरलेल्या दिवशी नियमित आयोजन केले जावे असे आदेश आहेत. त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे तथापि हे होत असल्याचे निदर्शनास येत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्यात पहिल्या शुक्रवारी पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी यांनी तक्रार निवारण दिन घ्यावा,

» पान ३ वर

## सांगोला-पंढरपूर रोडवर तिहेरी अपघात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** दोन दुचाकी व कारच्या तिहेरी अपघातात अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत असलेल्या एका २२ वर्षीय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला. सांगोला-पंढरपूर रोडवरील मांजरी (देवकाते वाडी) पाटीजवळ हा अपघात झाला. सुनील संजय मोटे असे मृत विद्यार्थ्यांचे नाव आहे. अपघातात दोन दुचाकींवरील दोन विद्यार्थ्यांसह पती-पत्नी जखमी झाले असून, त्यांच्यावर सांगोल्यात खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नितीन काशिनाथ राठोड (ब्रह्मपुरी, ता. मंगळवेढा), शुभम मोहन हाके, धनाजी गणपत साळुंखे यांच्यासह त्यांच्या पत्नी अशी जखमींची नावे आहेत. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रणव परिचारक यांनी वाद मिटविला

# मंदिर परिसरात प्रशासन व छोट्या व्यापाऱ्यात तणाव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** शनिवार-रविवार सलग शासकीय सुट्टी असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांची संख्या वाढली आहे. विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन येणार असल्यामुळे प्रशासनाने विठ्ठल मंदिर परिसरात रस्त्यावर वसलेल्या छोट्या व्यापाऱ्यांना उठविण्यास सुरुवात केली. यामुळे प्रशासन व छोटे व्यापारी यांच्यात तणाव निर्माण झाला. याची माहिती मिळताच युवानेते प्रणव परिचारक यांनी येऊन प्रशासन व छोटे व्यापारी यांच्यातील तणाव दूर केला . पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांची संख्या वाढत आहे. यामुळे मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर



भाविक दिसून येत आहे. दोन दिवसापूर्वी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील विठ्ठलाच्या दर्शनासाठी आले होते. त्यांचा वाहनांचा ताफा मंदिर परिसरात व्हीआयपी गेटपर्यंत आला होता. यामुळे दर्शनासाठी आलेल्या भाविकांना त्रास सहन करावा लागला होता. याचे तीव्र पडसाद पंढरपुरात उमटले होते. आज शनिवारी जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन गिरीश महाजन विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणार असल्याने प्रशासनाने मंदिर परिसरात रस्त्यावर

» पान ३ वर


# वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

‘ दै.पंढरी संचार ’

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०८९४२३४६

दत्तात्रय बनसोडे - ९८९०९६४७५

बुकिंग मर्यादा १५ जानेवारीपर्यंत.

**सोलापूर :** जिल्ह्यात ऊस गाळप हंगामाला सुरवात होऊन दोन महिने उलटले. मात्र, जिल्ह्यातील १५ साखर कारखान्यांनी अद्याप ऊसबिलापोटी एक छदामही दिला नाही. तर आठ साखर कारखान्यांनी एफआरपीनुसार ५० टक्यांपेक्षा कमी ऊसबिल दिले आहे. अशा २३ साखर कारखान्यांना 'आरआरसी'ची नोटीस देण्याचा इशारा प्रादेशिक साखर सहसंचालकांनी दिला आहे.

### तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळावा

# मुलींनी सक्षम बनणे ही काळाची गरज आहे - सौ.शितलदेवी मोहिते पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शिक्षण विभाग - पंचायत समिती, माळशिरस आयोजित तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळावा या कार्यक्रमात मुलींना शिवरत्न फाउंडेशन व डॉटर मॉम्स फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ.शितलदेवी मोहिते पाटील यांनी मार्गदर्शन केले.यावेळी वेळापूर गावच्या माजी सरपंच सौ.विमलताई जानकर, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (योजना) सुलभा वठारे, गटविकास अधिकारी डॉ. आबासाहेब पवार,तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रियांका शिंदे, माजी नगराध्यक्षा ताई वावरे,नगरसेविका रेश्मा टेळे, अँडव्होकेट ऐश्वर्या कुलकर्णी - देशपांडे,पत्रकार शोभा वाघमोडे उपस्थित होत्या.

**माळशिरस :** मुलींनी शारीरिक, बौद्धिक, भावनिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनणे ही काळाची गरज आहे. आपण खंबीरपणे स्वतःचे रक्षण स्वतः करावे,अन्यायाविरोधात पेटून उठावे तरच समाजातील विघातक प्रवृत्तींना आळा बसेल.सामाजिक ऐक्य व सलोखा जपण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता,राष्ट्रभक्ती या मूल्यांची रुजवणूक शालेय जीवनात होणे महत्त्वाचे आहे असे मत शिवरत्न फाउंडेशन व डॉटर मॉम्स फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ.शितलदेवी मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शिक्षण विभाग - पंचायत समिती, माळशिरस आयोजित तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळावा या कार्यक्रमात त्यांनी मुलींना मार्गदर्शन केले.

यावेळी वेळापूर गावच्या माजी सरपंच सौ.विमलताई जानकर, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (योजना) सुलभा वठारे, गटविकास अधिकारी डॉ. आबासाहेब पवार,तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रियांका शिंदे, माजी नगराध्यक्षा ताई वावरे,नगरसेविका रेश्मा टेळे, अँडव्होकेट ऐश्वर्या कुलकर्णी - देशपांडे,पत्रकार शोभा वाघमोडे उपस्थित होत्या.

योगगुरु श्री. सचिन मुधोळे यांनी योग व प्राणायाम प्रात्यक्षिक घेतले. मुलींच्या चित्रकला, पोस्टर, रांगोळी, धावणे, कथाकथन, सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात आल्या. पानीव शाळेने श्री.सोमेश्वर तांदळे यांच्या नेतृत्वाखाली गीतमंचाचा बहारदार कार्यक्रम सादर केला. उल्लास नवभारत साक्षरता उपक्रमांतर्गत तालुकास्तरीय मेळाव्यात आहार व आरोग्य, डिजिटल साक्षरता, शिक्षण, माझे कुटुंब आणि शेजार, आपल्या अवतीभवती, शेतीविषयक अँप, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान आधारित खेळ, दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञान, बाळाची निगा आणि वजन, उंची, लसीकरण, आहार व स्वच्छता, दैनंदिन जीवनातील गणित या विषयावर विविध शैक्षणिक साहित्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले. प्रत्यक्ष असाक्षर व्यक्तींचा सहभाग उल्लेखनीय होता. उपस्थित सर्वांनी या मेळाव्याचे भरभरून कौतुक करत सहभागी शिक्षकांना प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिसावित्री कु.अनुष्का शेंडे या बालिका होत्या. प्रास्ताविक विस्तार अधिकारी सुषमा महामुनी, सुत्रसंचालन गिरीजा नाईकनवरे व शहजादी काझी यांनी केले तर आभार केंद्रप्रमुख भक्ती नाचणे यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी गटशिक्षणाधिकारी प्रदीप करडे,विस्तार अधिकारी सुषमा महामुनी, तालुक्यातील केंद्रप्रमुख उज्वला नकाते,महादेवी गुंड,भक्ती नाचणे, सर्व मुख्याध्यापक, बी.आर. सी विभाग, अपंग समावेशित शिक्षण विभाग, कन्या माळशिरस,मुले १ व २ चे शिक्षक सोनी कानडे,चाँद नदाफ, सुवर्णा गोरे,पुष्पांजली शिखरे,राणी झुंजरुक या शिक्षकांनी सहकार्य केले.

## आ. सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नांना यश



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील भीमा सीना जोडकालव्याच्या सर्वेक्षणाला कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांनी बुधवारी मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरच या कामाचे सर्वेक्षण होणार असल्याची माहिती जलसंपदाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांनी दिली. आ. सुभाष देशमुख यांनी महायुती सरकारच्या काळात याबाबत वारंवार पाठपुरावा केला होता, अखेर त्याला यश आले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने भीमा सीना नदीजोड प्रकल्पास मंजुरी दिली होती. महायुती सरकारने 0. 511 टीएमसी पाण्याच्या तरतुदीस मंजुरी दिली होती.

## » Selected

## जिल्ह्यात वर्षात 47 हजार वाहनांची खरेदी



**सोलापूर :** दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत वाढ होत असून, आजच्या काळात प्रत्येकाच्या घरी दुचाकी किंवा चारचाकी वाहन गरजेची वस्तू बनली आहे. सोलापूर शहर-जिल्ह्यात चालू आर्थिक वर्षात सुमारे 47 हजार 665 वाहनांची नागरिकांनी खरेदी केली आहे. एकूण जिल्ह्यात दुचाकीसह विविध प्रकारचे 12 लाख 77 हजार 342 वाहनांची नोंदणी प्रादेशिक परिवहन विभागाकडे झाली आहे.

## जिल्ह्यातील १३२५ जणांचे रद्द होणार शस्त्र परवाने




**सोलापूर :** जिल्ह्यातील ग्रामीणमधील चार हजार ७८ जणांकडे तर शहरातील ५०२ व्यक्तींकडे वैयक्तिक शस्त्र परवाने आहेत. त्यांनी स्वत:रक्षणासाठी पोलिसांकडून बंदूक वापरण्याचा परवाना घेतला. मात्र, आता नवीन परवाने देण्याचे बंद करण्यात आले असून पहिल्यांदाच सोलापूरचे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी ग्रामीणमधील एक हजार ३२५ जणांचे शस्त्र परवाने रद्द करण्यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठविला आहे.

## घरात व शौचालयात लपविल्या दारुच्या ९०० बाटल्या!



**सोलापूर :** गोवा बनावटीचा तीन लाख ८५ हजार रुपयांचा मद्यसाठा राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला आहे. या पथकाने शहाजी गायकवाड (रा. गायकवाड वस्ती, टाकळी सिकंदर, ता. मोहोळ) याने शौचालयात लपविलेल्या भारतीय बनावटीच्या गोवानिर्मित विदेशी दारुच्या ३०० बाटल्या व आकाश धनंजय गवळी याच्या घरातून ६०० बाटल्या जप्त करुन दोघांना अटक केली आहे.

## वाल्मिक कराडला व्हीआयपी सेवा नकोच...




**सोलापूर :** आरोपी कुठल्याही प्रकारचा असो. आरोपीला व्हीआयपी सेवा देणे संपूर्णपणे चुकीचे आहे. बीड प्रकरणात वाल्मीक कराडला जर व्हीआयपी सेवा मिळत असतील तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अशी थेट मागणी खासदार निलेश लंके यांनी केली. खासदार निलेश लंके हे पंढरपुरात आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. प्रसंगी राधाकृष्ण विखे पाटील यांच्या एसआयटी चौकशीनंतर मुंडेंचा निर्णय होईल या वक्तव्याला महत्त्व न देता. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी लवकरात लवकर निर्णय घ्यावा. अशीही मागणी लंके यांनी केली.

# नगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक ७ चे विविध स्पर्धांत यश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बौद्धिक स्पर्धांमध्ये आपल्या नगरपालिका शाळा क्रमांक ७ने मोठे यश संपादन केले आहे दिनांक 3 जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या किशोरी मेळावा व बौद्धिक स्पर्धांमध्ये पंढरपूर शहरातील नगरपालिकेच्या सर्व शाळांनी सहभाग नोंदवला त्यात नगरपालिका शाळा क्रमांक ७ च्या पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले अश्विनी राजेंद्र कांबळे (रंगभरण स्पर्धा तृतीय क्रमांक )लक्ष्मी संतोष वाघमारे (रांगोळी स्पर्धा उत्तेजनार्थ)अनुष्का दत्ता धोत्रे( निबंध स्पर्धा तृतीय क्रमांक) वेदांत कुंदन खिलारे (निबंध स्पर्धा द्वितीय क्रमांक ) ईशा बापू कांबळे (वक्तृत्व स्पर्धा द्वितीय क्रमांक )अनुष्का दत्ता धोत्रे (वक्तृत्व स्पर्धा उत्तेजनार्थ )सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी माननीय अर्चना जनबंधू मॅडम यांच्या हस्ते पारितोषिक देउन गौरविण्यात आले. सहभागी सर्व स्पर्धकांनी अतिशय चांगली कामगिरी केली त्याबद्दल स्पर्धकांचे आणि विजेत्यांचे शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका सौ गीता घोडके मार्गदर्शक शिक्षक सौ शुभांगी कुलकर्णी श्री धोंडीराम तांदळे श्रीमती वैशाली सावळे आदींनी अभिनंदन केले आहे.

## नियुक्ती...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट )पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने, युवासेना सचिव वरुण सरदेसाई, युवासेना कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. गुरशीन कौर सहानी, युवती सेना जिल्हाप्रमुख पूजा खंदारे यांच्या मार्गदर्शनाने युवती सेना 'उपजिल्हाप्रमुख' सोलापूर पदी हर्षदा कुमार सोलनकर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना नियुक्तीचे पत्र शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

# श्रीमंत दौलतराव उर्फ (बाबासाहेब ) बाजीराव देशमुख यांची 19 वी पुण्यतिथी साजरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** दौलतराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कै. श्रीमंत दौलतराव उर्फ (बाबासाहेब ) बाजीराव देशमुख यांची 19 वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापक श्री. लवटे सर यांनी केले. यावेळी कै .बाबांच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष महोदय व मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले. कै .श्रीमंत.बाबांच्या स्मरणार्थ इयत्ता दहावी व बारावी मध्ये प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना नानासाहेबांच्या तर्फे पारितोषिक देण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार बाबासाहेबांचे निष्ठावंत सहकारी श्री. बाळासाहेब बडवे तसेच श्री. जीवन पाटील सर श्री .चंदूकाका देशमुख ,पी .एच. देशमुख सर यांनी बाबांच्या जीवनकार्याचा परिचय करून देताना पन्नास वर्षांपूर्वीच्या आठवणींना उजाळा देत असताना स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या कार्याला खऱ्या अर्थाने साथ व दिशा देण्याचे काम कै. श्रीमंत बाबांनी केले असे नमूद करताना इतिहास कायम जिवंत असतो असेही सांगितले. कै. श्रीमंत.बाबांनी केलेल्या विविध विकास कामांचा व गोरगरिबांसाठी केलेल्या कार्याचा ही आढावा घेण्यात आला. याप्रसंगी बाबांवर प्रेम करणाऱ्या , निष्ठा असणाऱ्या त्यांच्या असंख्य सहका-यांनी उपस्थिती दर्शविली व त्यांना अभिवादन केले. यावेळी कासेगाव चे सरपंच, उपसरपंच , आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य , कासेगावचे प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रशालेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री. लवटे सर ,नूतन पर्यवेक्षक श्री. करडे सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# महात्मा फुले विद्यालयात महिला मुक्ती दिन साजरा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** श्रीनाथ विद्यालय व ज्युनियर कॉलेज व महात्मा फुले विद्यालय माळशिरस या विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व महिला मुक्ती दिन साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक मधूकर गुंड व प्राचार्य योगेश गुजरे यांच्या हस्ते करण्यात आले.सावित्रीच्या लेकी विद्यालयातील मुली वेगवेगळे पोशाख परिधान करुन आल्या होत्या.तद्नंतर विद्यालयातील मुलींनी व मुख्याध्यापक मधूकर गुंड व प्राचार्य योगेश गुजरे यांनी आपआपले विचार व्यक्त केले. यावेळी मुलींना आरोग्य विषयक व बेटी बचाव, बेटी पढाओ जबाबदारी यासंबंधी मार्गदर्शन केले.पहिली कर्तबगारी शिक्षिका, मुख्याध्यापिका नारी म्हणून ज्यांना मान मिळाला त्यांचे विचार आचरणात आणले पाहिजे असे सांगण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापक मधूकर गुंड, प्राचार्य योगेश गुजरे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व बहुसंख्य पालकवर्ग उपस्थित होता.




गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधे रक्तदान शिबिर संपन्न

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सांगोला येथील रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून सांगोला येथील रेवनील ब्लड बँक व शिवाजी पॉलीटेक्निक कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर तसेच विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे उद्घाटन सांगोला शहरातील नामवंत डॉक्टर शैलेश डोंबे, डॉ.अजिंक्य नस्टे, डॉ. बसवराज पाटील डॉ. विजय फुले, संस्थेचे सचिव श्री. अंकुशराव गायकवाड, युवा विश्वस्त डॉ. यशोदीप गायकवाड यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिवाजी पॉलीटेक्निक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत तब्बल 101 विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक कार्यात योगदान दिले. सामाजिक कार्यात संस्थेचे अध्यक्ष श्री. बाबुराव गायकवाड व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी पॉलीटेक्निक कॉलेज नेहमीच अग्रेसर राहिले असल्याचे उद्गार यावेळी प्रमुख पाहुण्यांनी काढले.यावेळी 210 विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणीही करण्यात आली. बालिका दिनाचे औचित्य साधून सांगोला येथील नामवंत स्त्रीरोग तज्ञ डॉ. मेघना देवकते यांचे महिलांचे मानसिक व शारीरिक आरोग्य या विषयावर विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन सत्र संपन्न झाले. यावेळी बोलताना त्यांनी विद्यार्थिनींनी कशाप्रकारे आपल्या मानसिक व शारीरिक आरोग्याची काळजी घ्यायला हवी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर रक्तदान शिबिर व आरोग्य विषयक व्याख्यान संस्थेचे अध्यक्ष श्री. बाबुराव गायकवाड व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली व कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी करण्यासाठी समन्वयक प्रा. पृथ्वीराज लिगाडे, प्रा. दीपाली जुगदर, प्रा. श्रेया कुलकर्णी,सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.



**सोलापूर :** उजनीतील सध्या उपलब्ध असलेल्या पाणी साठ्यानुसार जलसंपदा विभागामार्फत 1 मार्च व 1 एप्रिल अशा एकूण 3 पाळ्यात पाणी सिंचनासाठी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे; परंतु सिंचनासाठी पहिले आवर्तन उजनी धरणातून सोडल्यानंतर येत्या फेब्रुवारी महिन्यांत उजनी प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीची पुन्हा बैठक घेऊन उपलब्ध पाण्यातून जास्तीत जास्त पाणी देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांनी दिली.

## स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा
# ‘अविष्कार-२०२४’मध्ये यशस्वी सहभाग

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने पुन्हा एकदा संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात यशाची नवी उदाहरणे सादर केली आहेत. विद्यापीठस्तरीय स्पर्धेत स्वेरीच्या दोन प्रकल्पांची निवड राज्यस्तरीय ‘अविष्कार २०२४' साठी झाली आहे. या यशाबद्दल स्वेरीतील संशोधकांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

‘स्वेरी’ हे संशोधन आणि नवोपक्रमशील संस्कृतीचे प्रतीक आहे हे आता सर्वश्रुत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत विद्यापीठस्तरीय ‘अविष्कार २०२४’ ही संशोधन स्पर्धा सोलापूर मधील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये आयोजित केली होती. या स्पर्धेत पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ३० हून अधिक महाविद्यालयांतील ४१४ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे संयोजन डॉ. रश्मी दीक्षित आणि डॉ. सतीश काशीद यांनी केले. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना सादर करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ प्रदान करणारी ठरली. यामध्ये स्वेरीच्या दोन प्रकल्पांनी उल्लेखनीय कामगिरी केली. स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात पीएच.डी. अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेले प्रा.अमितकुमार रामचंद्र शेलार यांनी प्युअर सायन्सेस (पीपीजी) गटात पहिला क्रमांक मिळवला. त्यांना स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणारे रोहित शंकर पवार यांना कृषी (युजी) गटात दुसरा क्रमांक मिळाला. त्यांना संशोधन अधिष्ठाता डॉ. ए. पी. केने यांचे मार्गदर्शन लाभले. ‘अविष्कार २०२४’ स्पर्धेकरिता समन्वयक म्हणून प्रा. दिग्विजय रोंगे यांनी काम पाहिले. यशस्वी संशोधक विद्यार्थ्यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे आणि उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी विजेत्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शकांचे अभिनंदन केले व त्यांचे कष्ट आणि नाविन्यपूर्ण विचारांची प्रशंसा केली. विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे आणि प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. दामा म्हणाले की, ‘अविष्कार मध्ये विजेतेपद मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तयारी करावी. आणि त्यात देखील यश खेचून आणावे.’ असे सांगून उपयुक्त मार्गदर्शन केले. सन २००६ साली महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल एस.एम. कृष्णा यांच्या पुढाकाराने विद्यापीठस्तरीय ‘अविष्कार’ ही संशोधनात्मक स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये घेण्यात येते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुणांना चालना देणे, त्यांच्यामधील संशोधनवृत्ती जोपासणे, नाविन्यपूर्ण विचारांसाठी प्रोत्साहित करणे आणि संशोधनाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवणे यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची ठरली आहे. युनिव्हर्सिटी स्तरावरील या स्पर्धेत प्युअर सायन्सेस, कृषी, ह्युमॅनिटीज, इंजिनिअरिंग अशा विविध श्रेणींमध्ये युजी, पीजी आणि पीपीजी स्तरावरील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी निवडलेले प्रकल्प आता राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करतील. स्वेरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नाविन्यपूर्ण संशोधनाचा गौरव सर्व स्तरातून करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये मिळविलेले यश महाविद्यालयातील संशोधन आणि नवकल्पना वाढवण्याच्या कटिबद्धतेचे परिमाण आहे, तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशीलतेचा आणि ज्ञानाचा शोध घेण्यासाठी प्रेरणा देणारे आहे, हे मात्र निश्चित!

## शेतात जायला रस्ता नाही, आता नो टेंशन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** शेतीत रस्त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मात्र, शेत रस्ता न मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 च्या कलम 143 अन्वये शेतकरी तहसील कार्यालयात अर्ज करून कायदेशीर रीत्या शेत रस्ता मिळवू शकतो. अर्जासाठी शेताचा नकाशा, सातबारा उतारा, शेजारी शेतकऱ्यांचे तपशील आणि वाद असल्यास त्याची प्रत जोडावी लागते. तहसीलदार अर्जाची छाननी करून, शेताची पाहणी करतात व शेजारील शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकतात. पुरावे आणि पाहणीच्या आधारे अंतिम निर्णय घेतला जातो.

» पान १ वरुन

## नवीन वर्षात प्रत्येक पोलीस ठाण्यात तक्रार...

महिने काम होत नसल्याने नागरिकांत तीव्र संताप व्यक्त करण्यात येतो याची दखल घेऊन शासनाने प्रत्येक महिन्याला जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे. यामध्ये नागरिक तालुका स्तरावर ग्रामीण स्तरावर काम न झाल्यास लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतात याची दखल जिल्हाधिकारी कडून घेतली जाते. व संबंधित शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना नागरिकांच्या कामाची दखल घेऊन ते ताबडतोब करण्याचे आदेश दिले जाते यामुळे लोकशाही दिनास चांगला प्रतिसाद मिळत आहे. याच धर्तीवर जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांनी दर शनिवारी पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले आहे. याचा फायदा नागरिकांना होणार आहे.

## जिल्ह्यात तालुका स्तरावरील ...

तिसऱ्या सोमवारी तहसीलदार यांनी त्यांचे कार्यालयात लोकशाही दिन , तसेच महानगरपालिका, नगरपालिका स्तरावरही लोकशाही दिन घेण्याचे आदेश आहेत त्याची जिल्ह्यात अंमलबजावणी होत नाही,ती नियमित व्हावी जेणेकरून नागरिकांच्या अडचणी, समस्या तात्काळ सुटतील व शासनाचा हेतू सफल होईल अशी अपेक्षा प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते,सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख सौ माधुरी परदेशी, सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर यांनी व्यक्त केली आहे.

## मंदिर परिसरात प्रशासन व छोट्या....

साहित्य विक्रीसाठी वसलेल्या छोट्या व्यावसायिकांना उठविण्यास सुरुवात केली. यामुळे प्रशासन व व्यापारी यांच्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले याची माहिती युवा नेते प्रणव परिचारक यांना मिळताच त्यांनी तात्काळ मंदिर परिसरात येऊन प्रशासन व छोट्या व्यापाऱ्यांची बैठक घेऊन त्यांच्यातील मतभेद मिटविले.मंदिर परिसरात गोरगरीब नागरिक विविध वस्तू विक्री करण्यासाठी बसत आहेत मात्र त्यांना प्रशासनाकडून त्रास होत असल्याने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

## महात्मा फुले संघटनेकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** समाजातील विशिष्ट घटकाचा रोष पत्करून स्त्रियांसाठी साक्षरतेची वाट प्रकाशमान करणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती शुक्रवारी (दि. 3) भाळवणी (तालुका : पंढरपूर) परिसरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा, महाविद्यालय या ठिकाणी प्रतिमा पूजन करून तसेच विविध संघटनेच्यावतीने जनजागृतीपर व्याख्याने, शालेय साहित्य वाटप अशा विविध उपक्रमांसह स्त्री शक्तीचा आवाज आणखी बुलंद करण्याचा संकल्प सोडत क्रांतीज्योतीला अभिवादन करण्यात आले.

ग्रामपंचायत भाळवणी येथील कार्यालयात जेष्ठ नागरिक ज्ञानेश्वर खरडकर व ग्रामपंचायत सदस्य पोपट इंगोले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. तसेच महात्मा फुले युवक संघटना यांच्यावतीने जिल्हा परिषद शाळा व भाळवणी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी शालेय साहित्य वाटपामुळे विद्यार्थी भारावून गेले. यावेळी विद्यालयातील शिक्षिका एम के. भोसले, यांनी सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान, सामाजिक क्रांतीतील महत्त्व आणि म. फुले यांच्या तीन पत्रातील मजकूर आणि आजच्या संदर्भातील उपयुक्तता सांगितली तसेच स्त्रीसक्षमीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांवर सखोल व्याख्यान दिले. त्यांनी शिक्षणासाठी घेतलेली मेहनत, त्यांच्या कष्टामुळेच आज सरपंच ते राष्टपती व उच्च पदापासून ते अंतराळवीरापर्यंत महिलांनी झेप घेतली त्याचा सार्थ अभिमान आहे. आता घरो घरी सावित्रीबाई फुलेच्या विचाराची गरज आहे असे मत व्यक्त केले.

## निवेदन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सांगोला :** राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांची आमदार बाबासाहेब देशमुख यांनी भेट घेतली. करमाळा मतदार संघातील विविध प्रश्न मार्गी लावण्याचे निवेदनही त्यांना देण्यात आले. स्वर्गीय आमदार गणपत आबा देशमुख यांच्या यांच्या विचाराचा वारसा घेऊन डॉ. बाबासाहेब देशमुख हे काम करत आहेत.

» Selected

## सोलापूरच्या ७ खो-खो खेळाडूंची निवड



**सोलापूर :** धाराशिव येथे रविवार ५ जानेवारी रोजी होणाऱ्या नॅशनल गेम्सच्या निवड चाचणीसाठी सोलापूर जिल्ह्यातून ४ पुरुष व २ महिला खो-खो खेळाडूंची निवड करण्यात आली. जिल्हा खो-खो निवड चाचणी उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या वतीने ह. दे. प्रशालेच्या मैदानावर झाली. यात 30 खेळाडूंनी भाग घेतला होता. यातून निवड समिती सदस्य श्रीरंग बनसोडे, उमाकांत गायकवाड व अतुल जाधव यांनी निवड केली. निवड झालेल्या खेळाडूंना सोलापूर ॲम्युचर खोखो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सचिव ए. बी. संगवे यांनी शुभेच्छा दिल्या.

## विवेक वर्धिनीचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम कलाविष्कार उत्साहात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** श्री.दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे 63 व्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त प्रशालेमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने नटलेल्या कलाविष्कार या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच सचिव अॅड. वैभव टोमके यांनी केले.

यावेळी प्रशालेतील माध्यमिक ,उच्च माध्यमिक, व्यवसाय शिक्षण विभाग या विभागातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले .यामध्ये कोळीगीत, भक्ती गीत, रिमिक्स गीत, ऐतिहासिक प्रसंग, वाघ्या मुळे, गोंधळ गीत,आदिवासी गीत अशा विविध प्रकारचे सुंदर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांच्या या बहारदार कार्यक्रमास सर्व रसिका प्रेक्षक, पालक, विद्यार्थ्यांनी भरभरून साथ दिली, प्रोत्साहन दिले . यावेळी संस्थेचे खजिनदार सलीम भाई वडगावकर तसेच प्रशालेतील शिक्षक, राजूभाई मुलाणी,धुरके एस एम यांनी गायन कला सादर केली.

सर्व कलाकारांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर, उपाध्यक्ष प्रा. शिवाजी वाघ, ज्येष्ठ संचालक आपासाहेब चोपडे, संचालिका सुनिताताई मोरे सर्व संचालक मंडळ , प्राचार्य डॉ.मुंढे यु. आर. उपमुख्याध्यापक सुनील पाटील, मुख्य लिपिक हनुमंत मोरे, ज्येष्ठ शिक्षक विलास दराडे , अशोक पवार, स्नेहसंमेलन प्रमुख बाबासाहेब सिरसट, अविनाश कटकधोंड, सांस्कृतिक विभाग प्रमुख बाळासाहेब शिंगाडे, सोमनाथ फडतरे, शितोळे एस. एम, शिंदे एम. बी. सर्व कमिटीचे प्रमुख सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी कौतुक केले.

## नगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या बौद्धिक स्पर्धा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** दि.३ जानेवारी 2025 रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ पंढरपूर यांच्या वतीने किशोरी मेळावा व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून पंढरपूर नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर उपस्थित होते. नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ पंढरपूरच्या प्रशासन अधिकारी माननीय अर्चना जनबंधू यांच्या मार्गदर्शनाखाली व नगरपालिका शाळा मधील सर्व शिक्षकांच्या सहकार्यातून नगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नगरपालिका शाळांच्या बौद्धिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या यामध्ये निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा रांगोळी स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा रंगभरण स्पर्धा हस्ताक्षर स्पर्धा अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. पंढरपूर शहरातील सर्व नगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी या उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेच्या आयोजनाबद्दल उपमुख्याधिकारी श्री सुनील वाळूजकर साहेब यांनी समाधान व्यक्त केले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांनी प्रेरित होऊन वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्न करत असणाऱ्या सर्व शिक्षकांचे कौतुक केले. सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच नगरपालिका शाळांच्या सर्व भौतिक सुविधा पूर्ण करण्यात येतील व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन याप्रसंगी दिले . या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी माननीय अर्चना जनबंधू मॅडम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी नगरपालिका शिक्षण मंडळाचे केंद्र समन्वयक माननीय श्री रामचंद्र बोडरे सर शाळा क्रमांक शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका शुभांगी शहाणे स्पर्धा समन्वयक श्री रमेश थोरात सर आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती टेळे यांनी केले तर आभार श्री हेमंत गुरव यांनी मानले. स्पर्धेच्या नियोजनाची जबाबदारी श्री अनिल गायकवाड श्री संतोष भांड व श्री गुरूशांत आळंद यांनी पार पाडली तर स्पर्धांच्या यशस्वीतेसाठी नगरपालिका शाळांचे सर्व मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

### दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर
### (महिला शाखा)
### नोटीस

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार भिमराव लक्ष्मण पिसाळ रा. पंढरपूर या नावावर अल्पबचत ठेव खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांची पत्नी अनिता भिमराव पिसाळ यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या अल्पबचत ठेव खात्यास अर्जदार अनिता भिमराव पिसाळ यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे!

**पंढरपूर**
**तारीख - ०४/०१/२०२५**

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर**
**( महिला शाखा)**




## दिगंबर सुडके यांनी घेतली प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची भेट
# तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या विकासासाठी आवश्यक निधीची तरतूद करावी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची पंढरपूर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दिगंबर सुडके यांनी मुंबई येथील पक्षाच्या कार्यालयात भेट घेऊन भूवैकुंठ पंढरी नगरीच्या विकासासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याची मागणी केली.

राज्यात महायुतीचे सरकार बहुमताने आले आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी आणि जिल्हा,तालुका,शहर स्तरावरील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या जोरावर मोठे यश मिळवले आहे. या यशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा विठ्ठलाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संजय घोडके, राजेश साळुंखे, जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शहराध्यक्ष दिगंबर सुडके यांनी सुनील तटकरे यांच्यासोबत पंढरपूर आणि परिसरातील नागरिकांच्या समस्या तसेच येणाऱ्या भाविकांच्या सोयीसुविधेबाबत सविस्तर चर्चा केली.

तीर्थक्षेत्र पंढरी नगरीत श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी लाखोच्या संख्येने भाविक दाखल होतात. येणाऱ्या भाविकांसाठी याचबरोबर पंढरपूर शहरातील स्थानिक नागरिकांसाठी चांगल्या प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने विशेषबाब म्हणून निधीची तरतूद करावी अशी मागणी शहराध्यक्ष दिगंबर सुडके यांनी केली.



# एसटी भाडेवाढ म्हणजे प्रवाशांवर बोजा

**सरकारने एसटी प्रवास भाडे कमी करण्यापेक्षा भरमसाठ वाढ करीत आहे ही बाब सर्वसामान्य प्रवाशांना न झेपणारी आहे. प्रवासभाड्यात १ किंवा २ टक्के वाढ कोणीही मान्य करू शकते व सहन करू शकते. परंतु प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली परिवहन महामंडळ जर १४.९५ टक्के प्रवास भाडे वाढ करीत असेल तर ही बाब सर्वसामान्यांच्या प्रती अत्यंत चिंताजनक बाब आहे. कारण सरकारने अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे स्वागतच. परंतु प्रवाशांच्या सुविधांच्या नावाखाली सर्वसामान्यांची दिशाभूल करू नये.**







## सामाजिक

रमेश लांजेवार, नागपूर

पंढरी संचार

प्रवाशांना किंवा नागरिकांना सुविधा देणे हे प्रत्येक सरकारचे कर्तव्य असते. त्यापध्दतीने सरकारला नियोजन सुध्दा करावे लागते ही बाब सत्य आहे. परंतु सरकार जर अचानक १४.९५ टक्के एवढी भरमसाठ वाढ करीत असेल तर असे म्हणायला हरकत नाही की सरकारने लागू केलेल्या अनेक योजनांची वसुली तर करीत नाही ना! अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात येईल. कारण प्रवाशांच्या सुविधांसाठी १ किंवा २ टक्के प्रवास भाडे वाढ ठीक आहे. यातुन महामंडळ चांगल्याप्रकारे सुविधा उपलब्ध करु शकते. त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने १४.९५ टक्के प्रवास भाडे यावर गांभीर्याने विचार करावा. कारण सरकार जेव्हा अनेक सुविधा नागरिकांना प्रदान करतात. तेव्हा त्याचा प्रथम विचार करायला हवा.अचानक जर आपण अवाढव्य भाडेवाढ करण्याचा विचार केला तर अनेकांची बोटे महामंडळ व सरकारवर उठतील. त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने भाडे वाढीचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे.

एसटी महामंडळाच्या प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी नव्या वर्षात ३५०० नव्या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहे ही आनंदाची बाब आहे व याचे स्वागतच.कारण राज्यात प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे १४.९५ टक्के भाडे वाढ ही बाब बरोबर नाही. राज्यात एसटी महामंडळाच्या १४ हजार बसेस धावतात यात ३५०० नवीन बसेस येतील यामुळे प्रवाशांना सुविधा उपलब्ध अवश्य होईल यात दुमत नाही. परंतु प्रवास भाड्यात १४.९५ टक्के वाढ करून याचा संपूर्ण भुर्दंड प्रवाशांवर लादु नये. शासनाने आपला खर्च कमी करावा, सरकारच्या अनेक कारवाईच्या मार्फत सरकारी तिजोरीत मोठ्या प्रमाणात काळा पैसा आलेला आहे त्याचा वापर यासाठी करावा, त्याचप्रकारे अनेक प्रकारचे कर जमा होतात त्यातून प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून द्यावी व प्रवाशांकडून हातभार म्हणून १ किंवा २ टक्के प्रवास भाडे वाढ करून सुविधा उपलब्ध करून द्यावी. यामुळे सरकार व प्रवासी यांच्यात समतोल राहील.

राज्यातील अनेक बसस्थानकांचा चेहरामोहरा बदलणार ही आनंदाची बाब आहे याचे स्वागतच. परंतु सरकार जेव्हा अनेक योजना राबविते तेव्हा सरकारजवळ आपोआप पैसे येतो आणि जेव्हा प्रवाशांना सुविधा देण्याचा निर्णय सरकार घेते तेव्हा सरकार प्रवाशांजवळुन १४ .९५ टक्के भाडे वाढ करून सुविधा देण्याची गोष्ट करते हे योग्य नाही.एसटी प्रवाशांना सुविधा अवश्य द्या परंतु अवाढव्य भाडेवाढ करून नाही तर समतोल राखुन. प्रवाशांना एसटी प्रवासात सवलत द्यायची सोडून सुविधांच्या नावाखाली भरमसाठ वाढ करून गरीब प्रवासी, शेतकरी, सर्वसामान्यांना सरकार लुटते की काय अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात निर्माण होत आहे.सरकारला व महामंडळाला एसटी प्रवाशांना खरोखरच सुविधा द्यायची असेल तर एखाद्या योजनेअंतर्गत द्यावी व एक किंवा दोन टक्के भाडेवाढ करून सरकारने प्रवाशांकडून मदत घ्यावी व एसटीचा आणि बसस्थानकाचा चेहरामोहरा बदलवावा आणि संपूर्ण महाराष्ट्रात एसटी महामंडळाने आपले आगळेवेगळे स्थापन प्रस्थापित करावे.

# पनव्या - भटक्या समाजाचे अनुभवविश्व मांडणारी कांदबरी

## पुस्तक परीक्षण

प्रा. डॉ. द.के.गंधारे
लेखक व समीक्षक

पंढरी संचार


प्रवीण जोशी हे लेखक व शिक्षक म्हणून सर्वदूर परिचित आहेत. त्यांची माणूसकीचा गाव, घरकूल, गल्हाट ही पुस्तके अत्यंत गाजलेली आहे. प्रवीण जोशी यांची 'पनव्या'ही कादंबरी परिस पब्लिकेशन, पुणे यांनी २०२४ मध्ये प्रकाशित केली आहे. 'पनव्या'ही कादंबरी भटक्या समाजाचे जीवनवास्तव साकारते. ही कादंबरी एकूण १४४ पृष्ठात विभागलेली असून या कादंबरीला प्रा. कुंडलिक कदम यांची सकस अशी प्रस्तावना लाभली आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांनी मलपृष्ठावर कादंबरीचे मर्म नोंदवलेले आहे .

वासुदेव, भविष्य व नंदीबैलाच्या खेळ यावर उदरनिर्वाह करणाऱ्या मेढंगी जोशी या जमातीचे वास्तव चित्रण या कादंबरीतून साकारलेले आहे. प्रवीण जोशी यांनी पनव्या ही कादंबरी काल्पनिक स्वरूपात मांडलेली असली तरी ती वाचत असताना वास्तवाची अनुभूती देऊन जाते. या कादंबरीची सुरुवात कापारेश्वराजवळच्या केडद या गावापासून सुरू होते.

मेढंगी जोशी या भटक्या समाजातील स्त्रियांचे भावविश्व लेखकाने साकारलेले आहे. लेखक हे भटक्या समाजातील नाही तरी ही कादंबरी वास्तवाचा ठाव घेते. गावोगावी भटकंती करत घरोघरी जावून गोधड्या शिवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या या महिलांची भटकंती कादंबरीत साकारली आहे. पावसाचे भविष्य सांगणारा हा नंदीबैलवाला आपले खरे आयुष्य दारिद्र्यात जगतो आहे हा अनुभव लेखक मांडत जातात.

प्रवीण जोशी यांनी कादंबरीच्या पानापानातून भटक्या समाजातील एकूणच परिवाराच्या व्यथा वेदना मांडलेल्या आहेत. या समाजाच्या रूढी परंपरा वेगवेगळ्या आहेत त्याचेही कादंबरीतून दर्शन घडते. प्रवीण जोशी यांनी भटक्या समाजाचा अनुभव आपल्या कादंबरीतून मांडला असला तरी तसा या समाजाचा त्यांचा जवळून संबंध नाही. मेढंगी हा समाज आपले पोट भरण्यासाठी गावोगाव भटकंती करतो. राघू आप्पा आणि पारूबाई यांच्या कुटुंबातील ही भटकंतीची व्यथा आहे.

पोटाची खळगी भरण्यासाठी हे कुटुंब गावोगाव भटकंती करतात. मुलांची संख्या अधिक असल्याने त्यांची होणारी ससेहोलपट राघूआप्पा आणि पारूबाई यांच्या रूपाने मांडली आहे. जीवनाचा शेवट करून घ्यावा असे प्रसंग या कादंबरीच्या पानापानातून ठिकठिकाणी आले आहेत. अशा अनेक घटना प्रसंगातून ही कादंबरी साकारत जाते. या कादंबरीत नसबंदीचा काळ दाखविलेला आहे. आज भटकंती करणारा हा समाज मुख्य प्रवाहापासून दूर आहे. अशा या समाजाविषयी प्रवीण जोशी यांनी भटक्यांचा जीवनपट या कादंबरीतून मांडलेला आहे. एकूणच ही कादंबरी भटक्या समाजाचे जीवन वास्तव साकारते. नक्कीच या कादंबरीला वाचक स्वीकारतील अशी आशा आहे.




**पुस्तक** - पनव्या
**लेखक** - प्रवीण अशोकराव जोशी.
**प्रकाशक** - परिस पब्लिकेशन पुणे.
**पृष्ठ संख्या** - १४४
**मूल्य** - २५० रुपये.

# आरामदायक आणि स्टायलिश फुटवेअर



**तरुणींमध्ये सँडल्स आणि हील्सच्या वापराची फॅशन अत्यंत लोकप्रिय आहे. यांचे आकर्षण त्यांच्या स्टायलिश लुक, आरामदायक डिझाईन, आणि विविध प्रसंगांमध्ये योग्यतेनुसार अनुकूलता यामुळे वाढले आहे. सँडल्स आणि हील्स हे फुटवियर स्टाइल्स तरुणींना फॉर्मल, कॅज्युअल आणि पार्टी लूकसाठी सजवण्याचे उत्तम पर्याय आहेत. या दोन प्रकारांच्या फुटवियरने फॅशन जगतात त्यांचे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.**



## फॅशन

ज्योती हांडगे, पुणे

पंढरी संचार



### सँडल्स: आरामदायक आणि हलके

१) सँडल्स हे हलके, आरामदायक आणि वेगवेगळ्या प्रकारांमध्ये उपलब्ध असतात. हे मुख्यतः उन्हाळ्यात आणि हलक्या वातावरणात वापरले जातात. सँडल्समध्ये विविध डिझाईन्स आणि स्टाइल्स आहेत, ज्यामुळे ते तरुणींना कॅज्युअल लूकसाठी एक उत्तम पर्याय बनतात. ते सहजपणे जीन, शॉर्ट्स, स्कर्ट आणि इतर हलक्या कपड्यांसोबत वापरता येतात.

२) फ्लिप-फ्लॉप्स आणि स्लिप-ऑन्स हे काही प्रसिद्ध सँडल्स आहेत, जे तरुणींमध्ये लोकप्रिय आहेत. हे उबदार आणि आरामदायक असतात, ज्यामुळे चालताना हलका आणि आरामदायक अनुभव मिळतो. सँडल्स विशेषत: उन्हाळ्याच्या महिन्यांत समुद्रकिनाऱ्यावर किंवा छान वाळूत फिरण्यासाठी आदर्श ठरतात.

### हील्स: स्टायलिश आणि फॉर्मल फुटवियर

१) हील्स हे एक प्रकारचे उच्च व उंच फुटवियर आहेत, जे तरुणींमध्ये पारंपरिक, फॉर्मल, आणि पार्टी लूकसाठी अत्यंत लोकप्रिय आहेत. पंप हील्स, स्ट्रॅपी हील्स, ब्लॉक हील्स, आणि किटन हील्स हे काही प्रसिद्ध प्रकार आहेत. या विविध प्रकारांमध्ये तरुणी त्यांना त्यांच्या आउटफिटसाठी योग्य असा लूक निवडू शकतात.

२) ब्लॉक हील्स हे अधिक आरामदायक असतात आणि हलका फुटवियर म्हणून वापरले जातात. ब्लॉक हील्सचा वापर तरुणी ऑफिस वेस्टर्न ड्रेस कोड किंवा कॅज्युअल पार्टीसाठीही करू शकतात. पंप हील्स हे पार्टी आणि फॉर्मल फॅशनसाठी आदर्श असतात. पंप हील्स चे डिजाईन खूप क्लासिक आणि ईलिगंट असतात, जे महिलांच्या व्यक्तिमत्त्वात एक निश्चित परिष्कृत लूक आणतात

# महिलांना सक्षम करणारी आजची रणरागिणी !



## डॉ. प्राची पुंडेंचा प्रेरणादायी प्रवास

**२००८ पासून लाइफ कोचिंग फर्म, प्रचिती कोकोरोद्वारे एकात्मिक औषधोपचारात उल्लेखनीय परिणाम मिळवून, दरमहा ८०-१२० प्रसूती करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या फर्मने ५५०० हून अधिक प्रकरणे हाताळण्यात आध्यात्मिक आणि ॲलोपॅथीचे मिश्रण करून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. वेलनेस साथी त्या फक्त डॉक्टर म्हणून थांबल्या नाही तर एक संशोधन करु इझी ग्लॅमवेल वेलनेस पेटंट त्यांनी मिळवला आहे. अशा डॉ प्राची पुंडे यांच्या यशस्वी प्रवासाचा आढावा घेणारा लेख ...**



## सक्सेस स्टोरी

विजय कुलकर्णी

पंढरी संचार

ग्रामीण भागातून शिक्षणाचा वसा घेत आपले ध्येय पुर्ण करण्यासाठी केलेली धडपड, जिद्द आणि रुग्णांची सेवा करण्याची लहानपणापासूनची इच्छा त्यातून मिळालेल यश हे आज नवीन ओळख करु पहात आहे. पेशाने डॉक्टर म्हणून काम करत असताना त्यांचा ग्रामीण भागातील महिलांशी संपर्क येत होता. त्यावेळी त्यांना अडीअडचणी तसेच आर्थिक दृष्टीने त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत करायची होती. मग सुरूवात कुठून करूयात तर स्वास्थ्यापासून म्हणून सर्वात पहिल्यांदा योग प्रशिक्षणापासून केली. ते सुरळीत सुरू होतेच पण महिलांसाठी करायचं काय? हा प्रश्न काही केल्या त्यांना शांत बसू देत नव्हता. याच पडलेल्या प्रश्नातून 'अभिजीता महिला हस्तकला केंद्र'या त्यांच्या स्वयंसेवी संस्थेची स्थापना झाली.

डॉ. प्राची पुंडे यांनी शाहू कॉलेजमधून शिक्षण घेत तब्बल ९८.६७ टक्के गुण मिळवून शिरपेचात तुरा रोवला त्यानंतर त्यांनी मनामध्ये ध्येय ठेवले तळागाळापासून ते उच्च पदापर्यंतच्या सर्व स्तरातील महिलांना सक्षम करणे, त्यांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिकस्तर वाढवणे. याकरिता विविध उपक्रम राबविले. अभिजीता महिला हस्तकला केंद्र या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून करमाळा, उस्मानाबाद तालुका, सोलापूर, बार्शी, लातूर या भागातील महिलांच्या २५० बचत गटांना सहभागी करून घेतले, यामाध्यमातून अडीच हजार महिलांना सदस्यत्व दिले, यास भारत सरकारच्या FSDO आणि NSDC द्वारे मान्यताप्राप्त आहे. कौशल्य विकासाद्वारे ग्रामीण महिलांचे उत्थान आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर बंजारा कलेचा प्रचार करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते.

त्यानंतर'ग्लॅमोवेल'ची सुरूवात झाली. या तत्वज्ञानाद्वारे समाजातील महिलांसाठी आरोग्यासाठी काम करत असताना ब्युटी क्वीन, मिसेस इंडिया, मिसेस ऑस्ट्रलआशिया आणि मिसेस युनिव्हर्स टॉलरन्स या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले आहे.'प्रोलक्स'(Proluxe) या पायोनियर कंपनीची स्थापना करत नव्या निरोगी समाजस्वास्थ्याची संकल्पना रुजविण्यास सुरुवात केली आहे.

### महिलांसाठी मोफत योग आणि ध्यान सत्र

तणाव, आरोग्य समस्या, समवयस्क समस्या आणि मादक पदार्थाचे दुरुपयोग यावर सानुकूलित समुपदेशन करण्यास सुरूवात केला. विविध आध्यात्मिक संस्थांकडून आध्यात्मिक व्याख्यानांचे आयोजन केले. मुलांसाठी संस्कार वर्ग (मूल्य शिक्षण वर्ग), बंजारा हँड एम्ब्रॉयडरी वर कार्यशाळा, सेक्टर स्किल कौन्सिलिंशी संलग्नित अभ्यासक्रम आणि होम फर्निशिंग एम्ब्रॉयडरी प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू केला. लाकडी काम, म्युरल्पा, स्टेन बुड आणि वाईट आर्टचे प्रशिक्षण वर्ग आयोजित केले. तसेच पापड, लोणची आणि चटणी बनवण्यासारखे लघुउद्योग उभारण्यासाठी मार्गदर्शन केले. यासर्व कला त्या स्वत: देखील शिकले आहे. २००८ पासून लाइफ कोचिंग फर्म, प्रचिती कोकोरोद्वारे एकात्मिक औषधोपचारात उल्लेखनीय परिणाम मिळवून, दरमहा ८०-१२० प्रसूती करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या फर्मने ५५०० हून अधिक प्रकरणे हाताळण्यात आध्यात्मिक आणि ॲलोपॅथीचे मिश्रण करून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

त्यांनी २५ पुस्तकांचे लेखन आणि प्रकाशन, कोकोरोच्या संचालिका आणि ProLuxe Wellness & Studio Pvt Ltd च्या संस्थापक संचालक या नात्याने, पेटंट मिळवून आणि एका अनोख्या मोबाइल ॲपसह निरोगीपणात क्रांती घडवली आहे.

# शब्दप्रभू गदिमा...

## पुस्तक परीक्षण

श्रीधर मधुकर खेडगीकर
सोलापूर

पंढरी संचार

मंतरलेले दिवस या गदिमांच्या पुस्तकात सुरुवातीलाच काही ओळी आहेत. त्या वाचल्यावर आपल्याला लक्षात येतं गदिमांना शब्दप्रभू का म्हटले जाते. अकरा ललित लेखांचे हे मंतरलेले पुस्तक आहे. गदिमा जेव्हा गावाकडे रेल्वेने जात त्याचे सुंदर वर्णन या लेखात सविस्तरपणे रंगवले आहे. माझा यवन मित्र.. या नावाचा एक लेख पुस्तकात आहे. नजम नकवी नावाचा मित्र गदिमांना होता. त्या मित्राविषयी या लेखात मांडणी केली आहे. तो शेवटी पाकिस्तानात पळून जातो. का जातो तो पाकिस्तानात. हे गुढच राहते. औंधाचा राजा नावाचा एक लेख आहे.. त्यात औंधच्या राजाची गोष्ट आहे. दो आखे बारा हात या चित्रपटासाठी गदिमांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता. लुळा रस्ता..

या नावाचा एक ललित लेख अतिशय वाचनीय आहे. या लेखात सखुबाईची कथा आहे. सखुबाईला एकदा पक्षाघाताचा झटका येतो तेव्हापासून आमच्या बंगल्यासमोरचा रस्ताच लुळा झाला आहे असे गदिमा म्हणतात. या लेखात नेमिनाथ या गदिमांच्या मित्राविषयी उल्लेख आहे.

गदिमांचा सहभाग असलेल्या तब्बल १६० मराठी आणि १५ हिंदी चित्रपटांची यादी पुस्तकात शेवटी दिली आहे. कथा, पटकथा, संवाद,गीते, अभिनय असे कोणत्या ना कोणत्या रूपात गदिमा त्यात आहेत. शब्दप्रभू गदिमा यांची साधी, सरळ आणि रसाळ भाषा मन मोहवून घेते."मंतरलेले दिवस"नक्कीच तुम्हाला भारावून टाकतील.




**पुस्तक:** मंतरलेले दिवस
**लेखक:** ग. दि. माडगूळकर
**प्रकाशक:** साकेत प्रकाशन
**पृष्ठे:** १७२
**मुल्य:**२७५

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

## At a Glance

### राहुल गांधींची गोपनीय परदेशवारी थांबणार

**नवी दिल्ली :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची परदेश यात्रेची गोपनीयता संपणार आहे. ते कुठे प्रवास करतात, कोणासोबत प्रवास करतात आणि तिकीटासंबंधीची संपूर्ण माहिती सरकारकडे उपलब्ध असणार आहे. कारण, विमान कंपन्यांना आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे १९ प्रकारचे वैयक्तीक तपशील सरकारला देणे अनिवार्य करण्यात आले आहे.

### मुंबईतील वांद्रे परिसरात भीषण आग

**मुंबई :** मुंबईतील वांद्रे भागात शनिवारी (०४ जानेवारी २०२४) दुपारी भीषण आग लागली. या आगीत २० ते २५ झोपड्या जळून खाक झाल्या आहेत. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली.

### ४५ लाखांची फसवणूक

**मुंबई :** राज्याचे माजी मुख्यमंत्री व खासदार नारायण राणे यांचे नाव घेत एका महिलेची तब्बल ५४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची धक्कादायक घटना वर्सोवा येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी फसवणूक झालेल्या महिलेने पोलिसांत तक्रार दिली असून चार ते पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

# अरविंद केजरीवालांच्या विरोधात भाजपकडून वर्मा

## आयातांना प्राधान्य; माजी मुख्यमंत्री साहिबसिंह वर्मा यांच्या मुलाला दिली उमेदवारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची पहिली यादी जाहीर झाली आहे. २९ उमेदवारांच्या या यादीत अरविंद केजरीवाल आणि मुख्यमंत्री आतिशी यांच्या विरोधात उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. प्रवेश साहिबसिंह वर्मा यांना नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून तर रमेश बिधुरी यांना कालकाजी मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे. याशिवाय 'आप विरुद्ध बंडखोरी करून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या कैलाश गेहलोत यांना बिजवासन मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

२९ उमेदवारांच्या यादीत भाजपने आदर्श नगर मतदारसंघातून राजकुमार भाटिया, बदली मतदारसंघातून दीपक चौधरी, नवी दिल्ली मतदारसंघातून प्रवेश वर्मा, कालकाजी मतदारसंघातून रमेश बिधुरी, बिजवासन जागेवरून कैलाश गेहलोत, मालवीय नगरमधून सतीश उपाध्याय यांना उमेदवारी दिली आहे. गांधी नगर मतदारसंघातून अरविंदर सिंग लवली, मंगोलपुरी मतदारसंघातून राजकुमार चौहान, रोहिणी मतदारसंघातून विजेंद्र गुप्ता, राजौरी येथील करोल बाग मतदारसंघातून दुष्यंत गौतम, मनजिंदर सिंग सिरसा यांना गार्डन मतदारसंघातून आणि आशिष सूद यांना जनकपुरी मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे.

याशिवाय आदर्श नगर येथील राजुमार भाटिया, रिठाळा येथील कुलवंत राणा, नांगलोई दात येथील मनोज शौकीन, मंगोलपुरी येथील राजकुमार चौहान, शालीमार बाग येथील रेखा गुप्ता, मॉडेल टाऊन येथील अशोक गोयल, पटेल नगर येथील राजकुमार आनंद, सरदार यांचा समावेश आहे. जंगपुरा येथील तरविंदर, आरके पूरम येथील अनिल शर्मा, महरौली येथील गजेंद्र यादव, छतरपूर, आंबेडकर नगर येथील कर्तारसिंग तन्वर, खुशीराम चुनार, बदरपूरमधून नारायण दत्त शर्मा, पटपरगंजमधून रवींद्र सिंह नेगी, विश्वास नगरमधून ओमप्रकाश शर्मा, कृष्णा नगरमधून अनिल गोयल, सीमापुरीमधून कुमारी रिंकू, रोहतास नगरमधून जितेंद्र महाजन आणि घोंडामधून अजय महावर यांना तिकीट मिळाले आहे.

### गृहनिर्माण धोरणात पर्यावरणपूरक घरांवर भर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** 'सर्वांसाठी घरे' ही महत्त्वाकांक्षी योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणामध्ये परवडणाऱ्या, टिकाऊ आणि पर्यावरणपूरक घरांवर भर द्यावा. याबाबत सविस्तर धोरण महिन्याभरात तयार करून नागरिकांना 'म्हाडा' तसेच गृहनिर्माण विभागाच्या योजनांचा सहज सुलभपणे लाभ घेता यावा. त्यासाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा वापर करावा. मुंबईतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.राज्य शासनाच्या माध्यमातून गिरणी कामगारांसाठी सुमारे एक लाख घरे बांधण्यात येणार आहेत. मुंबईच्या विकासासाठी लवकरच क्लस्टरची योजना सुरू करण्यात येणार असून या योजनेच्या माध्यमातून मुंबईत लक्षावधी घरे उपलब्ध होतील," असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे व्यक्त केला. 'सह्याद्री' अतिथीगृहावर उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गृहनिर्माण विभागाची आढावा बैठक घेण्यात आली.

# भारतीय लष्कराने बदलले धोरण!



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराने आपल्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीच्या पद्धतीत आता काही बदल केले आहेत. यापुढे सर्व लेफ्टनंट जनरलची गुणवत्ता यादी त्यांच्या कामगिरीच्या आधारे तयार करण्यात येणार आहे. हा नवा नियम ३१ मार्चपासून लागू होणार असून गुणवत्तेवर आधारित निवडीला प्राधान्य देण्याच्या उद्देशाने हा नवा बदल लागू केला जाणार आहे. या नव्या व्यवस्थेमुळे भारतीय लष्कराला इंटिग्रेटेड थिएटर कमांडमध्ये काम करण्यासाठी लेफ्टनंट जनरलच्या निवडीसाठी मदत होणार आहे. हे नवे धोरण लेफ्टनंट जनरलसाठी सुधारित वार्षिक गोपनीय अहवाल (एसीआर) फॉर्मअंतर्गत लागू करण्यात येणार आहे. लष्कराने लागू केलेले हे नवे धोरण लष्कराच्या सहा ऑपरेशनल कमांड आणि एका ट्रेनिंग कमांडच्या व्हाइस चीफ आणि कमांडर-इन-चीफला लागू होणार नाही. भारतीय लष्करात सुमारे ११ लाख सैनिक आहेत. लष्करात ९० हून अधिक लेफ्टनंट जनरल, ३०० मेजर जनरल आणि १२०० ब्रिगेडियर आहेत.

टाइम्स ऑफ इंडियाने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, नवीन धोरणामुळे भारतीय लष्कर भारतीय हवाई दल आणि भारतीय नौदलाशी जुळवून घेईल. आतापर्यंत लेफ्टनंट जनरलसाठी एसीआर यंत्रणा नव्हती. त्यांना आता विविध गुणांच्या आधारे १ ते ९ या स्केलवर मानांकन देण्यात येणार आहे. त्यांची पदोन्नती केवळ ज्येष्ठतेवर अवलंबून राहणार नसून त्यांनी केलेल्या कामगिरीच्या आधारे देखील त्यांची पदोन्नती होणार आहे. थिएटर कमांडच्या निर्मितीसाठी लष्कराच्या सर्वोच्च पदांवर तिन्ही दलांसाठी एकसमान मूल्यमापन प्रणाली आवश्यक होती. उप लष्करप्रमुख आणि सात लष्करी कमांडर-इन-चीफच्या निवडीसाठीही हे धोरण लागू होईल की नाही, हे लष्करमुख्यालयाच्या पत्रात स्पष्ट करण्यात आलेले नाही. सध्याच्या लष्करी धोरणानुसार कमांडर-इन-चीफ पदावरील पदोन्नती ही

**लष्कर**

पूर्णपणे ज्येष्ठतेवर अवलंबून असते. यात जन्मतारीख आणि उपलब्ध पदांचाही विचार केला जातो. लष्कराच्या १४ व्या कोअरपैकी एका कोअरचे नेतृत्व करणाऱ्या लेफ्टनंट जनरलला कमांडर-इन-चीफ म्हणून बढती मिळण्यासाठी किमान १८ महिन्यांची सेवा कालावधी शिल्लक असणे आवश्यक आहे.

काही अधिकारी नव्या धोरणाला विरोधही करत आहेत. लष्कराच्या कडक रचनेच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्तेनुसार मोजकेच अधिकारी पात्र ठरवले जातात आणि ते थ्री स्टार जनरल बनतात, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. लेफ्टनंट जनरल पदानंतर कमांडर-इन-चीफ पदावर पदोन्नती सेवाज्येष्ठतेवर अवलंबून होती. या टप्प्यावर गुणवत्तेचा समावेश केल्यास निवडीमध्ये हस्तक्षेपाची शक्यता वाढू शकते, मग ते राजकीय असो किंवा इतर. भारताने चीन, पाकिस्तान आणि हिंदी महासागर क्षेत्रासाठी तीन थिएटर कमांड तयार करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

# पंतप्रधानांकडून ज्यो बायडनांच्या पत्नीला १७ लाख रुपये किमतीचा हिरा भेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि त्यांच्या कुटुंबीयांना २०२३ मध्ये परदेशी नेत्यांकडून असंख्य भेटवस्तू मिळाल्या. मात्र या सर्व भेटवस्तूंपैकी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला २० हजार डॉलर्स किमतीचा हिऱ्याची गिफ्ट ही सर्वात महागडी गिफ्ट ठरले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने नुकतेच वार्षिक लेखा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार पंतप्रधान मोदी यांनी जिल बायडेन यांना दिलेला हिरा हा ७.५ कॅरेटचा होता. २०२३ या सालात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाच्या पत्नीला भेट म्हणून देण्यात आलेले सर्वात महागडे गिफ्ट होते, असं या अहवालात म्हटले आहे.

२०२३ या वर्षात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या पत्नीला विविध देशांच्या नेत्यांकडून मोठ मोठी गिफ्ट मिळाले होते, असं या अहवालात म्हटले आहे. अमेरिकेतील युक्रेनच्या राजदूताने जिल बायडेन यांना १४,०६३ डॉलर किमतीचा हार दिला होता. तर इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या पत्नीने ४,५१० डॉलर किंमतीचे ब्रेसलेट, हार आणि फोटो अल्बम मिळाला. २०२३ सालात खुद्द राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांना परदेशी नेत्यांकडून अनेक महागड्या भेटवस्तू मिळाल्या होत्या. दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष सुक योल यून यांनी ज्यो बायडेन यांना ७१०० डॉलर्स किंमतीचा फोटो अल्बम भेट दिला होता, असं या अहवालात म्हटले आहे. सुक योल यून यांच्यावर दक्षिण कोरियात नुकताच महाभियोग चालवण्यात आला होता.

# भुजबळ यांच्या मनधरणीला वेग

## खा. सुनील तटकरे लवकरच भेट घेण्याची शक्यता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**मुंबई :** मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटपावेळी चांगलेच मानापमान नाट्य रंगले. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी तीव्र नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली. तसेच अजित पवार यांच्यावर सडकून टीकाही केली. भुजबळ यांनी दोनदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावरून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. यानंतर आता भुजबळ यांच्या मनधरणीसाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रयत्न सुरू असून, हालचालींना वेग आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी याबाबत माहिती दिली.

तटकरे यांनी भुजबळ यांच्या नाराजीबाबत प्रथमच भाष्य केले. ते म्हणाले, की दिल्लीत असतानाही यासंदर्भात बोललो आहे. वेळोवेळी बोललो आहे. नंतरच्या कालावधीमध्ये भुजबळ परदेश दौऱ्यावर गेले. माझ्या माहितीप्रमाणे ते मायदेशात परतले आहेत; मी पण गेले पाच ते सहा दिवस रायगड-रत्नागिरीच्या दौऱ्यावर होतो. संघटनेची बैठकही घेतली. त्यामुळे आता एक ते दोन दिवसांत भुजबळ यांच्यांशी चर्चा होणे अपेक्षित आहे. नाराजी दूर होईलच, असा ठाम विश्वास तटकरे यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे १८ व १९ जानेवारी रोजी अडीचशे निमंत्रितांसाठी दोन दिवसीय शिबीर छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आल्याची माहितीही तटकरे यांनी दिली. या शिबिरात विद्यमान खासदार, विद्यमान आमदार, माजी खासदार, आमदार, विधानसभा लढलेले सर्व उमेदवार, फ्रंटल सेलचे प्रमुख व इतर सेलचे प्रमुख आणि विशेष निमंत्रित असणार आहेत.

### सभासद नोंदणी मोहीम

● दरम्यान, विधानसभेत आम्हाला ४१ जागांवर यश मिळाले. स्ट्राईक रेट दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे. पक्षाचा विस्तार राज्यभर करायचा आहे. सभासद नोंदणी मोहीम याच महिन्यात सुरू केली जाणार आहे. त्यानंतर संघटनात्मक कामाला गती द्यायची आहे. पक्षाचे काम फक्त राष्ट्रीय स्थितीपर्यंत मर्यादित न राहता समाजाच्या विविध क्षेत्रांशी निगडित असलेल्या बाबींवर लक्ष केंद्रित करत पक्षाची वाटचाल पुढच्या कालावधीत अधिक मजबूतीने कशी करता येईल यादृष्टीने विचार करणार आहोत, असे तटकरे यांनी सांगितले.

# मुंबई-नागपूर आता फक्त ८ तासांत होणार प्रवास



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** राज्यातील प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. मुंबई ते नागपूर या ७०१ किलोमीटर लांबीच्या समृद्धी एक्सप्रेसवेचे काम पूर्ण झाले आहे. पुढील महिन्यात या महामार्गाचे लोकार्पण होणार आहे. या द्रुतगती महामार्गाला 'हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' असे नाव देण्यात आले आहे. नागपूर ते नाशिकमधील इगतपुरी हे अंतर ६२५ किलोमीटर असून येथील काम शेवटच्या टप्प्यात आले आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यावर मुंबई ते नागपूर अंतर अवघ्या काही तासांवर येणार आहे. पूर्वी नागपूर ते मुंबईला जाण्यासाठी १६ तास लागत होते. हा प्रवास आता ८ तासांवर येणार आहे. समृध्दी महामार्ग हा राज्याच्या विकासाचा महामार्ग आहे असे म्हणत या मार्गाचे उद्‌घाटन मोदी यांच्या हस्ते करण्यात आले होते. हा मार्ग डिसेंबर २०२२ आणि मार्च २०२३ मध्ये प्रवाशांसाठी अंशत: खुला करण्यात आला आहे. आता या मार्गाच्या शेवटच्या विभागाचे बांधकामही पूर्ण झाले असून पुढील फेब्रुवारी महिन्यात या मार्गाचे उद्‌घाटन होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पासाठी अनिल कुमार बळीराम गायकवाड यांची मुख्य अभियंता म्हणून निवड केली होती. गायकवाड हे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत. हा प्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याचे बोलले जाते.

हा मार्ग पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात मोठा बदल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राष्ट्रीय राजधानी दिल्लीतील वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची पातळी कमी करण्याच्या उद्देशाने चार प्रकल्पांचा प्रस्ताव भारतीय जनता पक्षाच्या दिल्लीतील खासदारांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सादर केला.

### भौतिकशास्त्रज्ञ आर. चिदंबरम यांचे निधन



**नवी दिल्ली :** भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमात निर्णायक भूमिका बजावणारे भौतिकशास्त्रज्ञ डॉ. राजगोपाल चिदंबरम यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. अणुऊर्जा विभागाने दिलेल्या माहितीनुसार मुंबईतील जसलोक रुग्णालयात त्यांचे निधन झाले. हे जाहीर करताना आम्हाला दु:ख होत आहे की, प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ आणि भारतातील सर्वात प्रतिष्ठित शास्त्रज्ञांपैकी एक असलेले डॉ. राजगोपाल चिदंबरम यांचे निधन झाले. डॉ. चिदंबरम यांचे भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे.

# मंत्र्यांचे आरोपींना पाठबळ; जरांगे पाटलांचा आरोप; आरोपींच्या 'नार्को टेस्ट'ची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**परभणी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सर्व आरोपींची 'नार्को टेस्ट'करण्याची मागणी मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. यामध्ये सरकारमधील एखादा मंत्री सहभागी आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यामध्ये खूप मोठे रॅकेट असल्याचा दावा त्यांनी केला. सर्व आरोपींना पुण्यातूनच पकडण्यात आले आहे. याचा अर्थ सरकारमधील कोणत्या तरी मंत्र्याचे आरोपींना प्रचंड पाठबळ असल्याचा दावा त्यांनी केला. आरोपींना आतापर्यंत कोणी सांभाळले? त्यांना देखील अटक करायला सरकारने सुरुवात करायला हवी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

देशमुख हत्या प्रकरणात आरोपींना सांभाळण्यात ज्यांना मोठेपण वाटतो, त्यांना संभाळावे वाटते, त्यांना भाकरी खाऊ घालाव्या वाटतात, कोणाच्या तरी लेकीचा, लेकीच्या बापाचा खून केला, अशा आरोपींना जे सांभाळत आहेत, त्यांना देखील सरकारने तात्काळ अटक करायला हवी, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. खंडणीमधील आरोपींची 'नार्को टेस्ट' केली त्यानंतर शंभर टक्के सरकारमधील कोण कोण मंत्री आणि आमदार आहेत, ते समोर येईल, असा दावा त्यांनी केला आहे. हा शंभर टक्के सरकारमधील मंत्र्याचा डाव आहे.

# चीनमधील व्हायरसवर भारतीय डॉक्टरांचं मोठे वक्तव्यं

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** २०२० साली वर्षभर थैमान घालणाऱ्या कोविड व्हायरसने जगाला घाम फोडला होता. कोव्हिड काळात बसलेल्या आर्थीक तडाख्यातून बाहेर यायला खूप मोठा काळ जावा लागला. अशातच आता चीनमध्ये HMPV (ह्युमन मेटान्यूमोनोव्हायरस) आढळला असून यामुळे अनेकांचा मृत्यू झाला असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. चीनच्या अनेक रूगणालयांमध्ये रांगा लागल्या आहेत. अशातच आता भारतीय वैद्यकीय क्षेत्रातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी मोठे वक्तव्यं केलं आहे. ह्युमन मेटान्यूमोनोव्हायरस हा श्वसनाचा विषाणू आहे ज्यामुळे सामान्यतः सौम्य ते मध्यम फ्लू सारखी लक्षणे दिसून येतात. हिवाळ्याच्या सुरुवातीच्या काळात हा फ्लू जास्त प्रचलित आहे. समाजमाध्यमांवर चीनच्या रूगणालयात रांगा लागल्याचे चित्र असले तरी सुद्धा अधिकृत आकडेवारी अद्याप समोर आली नाही. सध्या सुरू असलेला निमोनियाचा उद्रेक विशेषतः लहान मुले आणि वृद्धं यांच्यासाठी चिंतेचा विषय आहे. लहानमुलांची रोगप्रतिकारक शक्ती पूर्णपणे विकसीत झालेली नसते, त्यामुळे अशा प्रकारच्या आजारात त्यांची काळजी घेणं अत्यंत महत्वाचे असते. दुसऱ्या बाजूला अस्थमा किंवा क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) सारख्या पूर्व-अस्तित्वात असलेल्या वृद्ध प्रौढांना या रोगाची लागण होण्याचा धोका जास्त असतो. या व्हायरस वर भाष्य करताना डॉ. अतुल गोयल बोलताना म्हणाले की हा व्हायरस सामान्य सर्दीला कारणीभूत व्हायरससारखा आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः तांदुळवाडी, ता- बारामती, जि - पुणे व परिसरातील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टातील नमूद बिगरशेती प्लॉट मिळकत तिचे विद्यमान मालक **अलका रघुनाथ जाधव व संग्राम रघुनाथ जाधव** यांनी आमचे अशिल यांना कायम खुष खरेदीदस्ताने विक्री करण्याचे मान्य करून तसा तोंडी ठरवून तशी विसारपावती करुन देवून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व त्यांचेशिवाय इतर कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध नसल्याची खात्री व भरवसा दिला आहे. परंतू या उपरही या मिळकतीचे मालकी हक्क, वाटप, ताबा, वहिवाट, करार, मदार, साठेखत, कुलमुखत्यार अगर इतर बाबींबाबत कोणाचीही कसलीही हरकत, व्यवहार अगर हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून आठ (८) दिवसांचे आत खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा आमचे अशिल कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध व अधिकार नसल्याचे ग्राह्य धरुन व असल्यास जाणिवपुर्वक सोडून दिल्याचे गृहीत धरून खरेदीखताचा दस्त करुन व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीची दखल घेतली जाणार नाही अगर कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :-** तुकडी पुणे पोट तुकडी व तालुका बारामती, मे. दुय्यम निबंधक सो., बारामती यांचे अधिकार कक्षेतील, बारामती नगरपरिषद वाढीव हद्दीतील गाव मौजे **तांदुळवाडी** येथील गट **नं. २३९/१/ब मधील बिगरशेती प्लॉट नं. २४ क्षेत्र २.३१.२१ आर.चौ.मी** यांसी चतु:सिमा पुर्वेस ६ मी. रुंदीचा रस्ता दक्षिणेस :- गटापैकी उर्वरीत क्षेत्र, पश्चिमेस :- प्लॉट नं. १६, उत्तरेस प्लॉट नं. २३ हा या जाहीर नोटीसीचा विषय असे.

बारामती
दिनांक:-२८/१२/२०२४

शिक्का

**(अ‍ॅड. सतिश दादा महानवर)**
**फ्लॅट नं. ०४, बिल्डींग-सी, कृष्णयोग टाऊनशिप, सूर्यनगरी, बारामती, जि. पुणे**
**मो.नं. ९४२३८५८८**

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४७१ / २०२४ |४२१३**

**अर्जदार**
आर. के. मॅजेस्टिक सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्व्हे नं. २६४/१(पैकी), मौजे बावधान बु. ता. हवेली, जि. पुणे
तर्फे सचिव, सौ. पायल महेश ठावरी, खजिनदार, सौ. मंजुषा सचिन गोगटे

**विरुद्ध**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. मे. आर. के. लाईफ स्पेस डेव्हलपर्स प्रा. लि.
तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर,
श्री. रुपेश हरीभाऊ कुंबरे,
ऑफिस पत्ता : स.नं. ८५, ऋषिकेश, आझादनगर, कोथरुड, पुणे ४११ ०३८. २.ए.श्री. गणपत आबु दगडे, बी. श्री. मनोहर आबु दगडे, सी. सुभद्राबाई आबु दगडे, पत्ता : स.नं. ८५, ऋषिकेश, आझादनगर, कोथरुड, पुणे ४११ ०३८.
(जा.दे.नं. २ तर्फे कु.मु. धारक म्हणून जा.दे. नं. १)
३.आर.के. ग्रासीया ए सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ता : स.नं. २६४/१,
पत्ता : स.नं. २६४/१ (पैकी)
मौजे बावधन बु., ता. हवेली, जि. पुणे ४११ ०२१.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये आर. के. मॅजेस्टिक सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सर्व्हे नं. २६४ / १(पैकी), मौजे बावधान बु. ता. हवेली, जि. पुणे या संस्थेचे मानव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४७१ / २०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/१२/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे अ‍ॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक २ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक २ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०९/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक २ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : ०९/०१/२०२५

शिक्का

**सही/-**
**संजय राऊत**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे**

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४६० / २०२४) ४२१६**

**अर्जदार**
गगन रेनाईसन्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्वे नं. ७/२/२ (पार्ट), पिसोळी, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४८
तर्फे, अध्यक्ष : श्री. सागर गोरे, सचिव : श्री. अरविंद लक्ष्मणराव सोनोने

**विरुद्ध**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. गगन लॅण्डमार्क्स तर्फे भागीदार
अ. श्री. हनीफ गुलामअली सोमजी, ब. श्री. अलनेश अकील सोमजी,
क. श्री. विशाल घनश्याम अग्रवाल, ड. श्री. सुशिल घनश्याम अग्रवाल,
ऑफिस पत्ता: १५/बी, वेलस्ली रोड, लाल देवळच्या बाजुला, पुणे- ४११ ००१. जाब देणार नं. २
२. श्री. हानीफ गुलामअली सोमजी, पत्ता: १५ / बी, वेलस्ली रोड, लाल देवळच्या बाजुला, पुणे- ४११ ००१.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये गगन रेनाईसन्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सर्वे नं. ७/२/२ (पार्ट), पिसोळी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०४८ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४६० / २०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १९/१२/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे अ‍ॅड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक १(अ ते ड) व २ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक १ ( अ ते ड ) व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०९/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक १(अ ते ड) व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : ०९/०१/२०२५

शिक्का

**सही/-**
**संजय राऊत**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे**

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४६४ / २०२४ | ४२१५**

**अर्जदार**
दर्शननगरी बी-४ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: स.नं. २९२/१, २९२/२, २९२/३, व स.नं. २९४/१०, केशवनगर, चिंचवड, ता. हवेली जि. पुणे- ४११ ०३३. तर्फे, अध्यक्ष : श्री. भास्कर मधुकर मेहेत्रे, सचिव : श्री. संजीव धोंडीराम निलावर

**विरुद्ध**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक जाब देणार नं. १
मे. गोयल बिल्डर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफीस पत्ता: १९९, मुंबई पुणे रोड, चिंचवड, ता. हवेली जि. पुणे - ४११०३३
तर्फे भागीदार, अ. श्री. राजेंन्द्र किशोरीलाल गोयल, ब. श्री. कृष्णकुमार किशोरीलाल गोयल दोघे
रा. पत्ता: ४०, बोपोडी, आशियाना पुणे- ४११ ००३.
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. अशोक बबन साठे, जाब देणार नं. २, रा. भोईरवाडा चिंचवडगांव, ता. हवेली पुणे- ४११०३३. ३. सागर सुभाष साठे, ४. सारिका सुभाष साठे, ५. शितल सुभाष साठे, ६. विमल सुभाष साठे ७. श्री. निखील राजु साठे, ८. पुनम राजु साठे, ९. पायल राजु साठे, १०. शारदा राजु साठे
जाब देणार नं. ३ ते १०, रा. चिंचवडेनगर, चिंचवड, ता. हवेली पुणे- ४११०३३.
११. श्री. श्रीधर खंडू गावडे, १२. श्री. शिवाजी खंडू गावडे, १३. श्री. गणेश खंडू गावडे, १४. दुर्गाबाई खंडू गावडे १५. श्री. सुरेश बबन साठे, १६. श्री. शिवाजी भिवा साठे, १७. श्री. सचिन भिवा साठे, १८. बेबी भिवा साठे १९. जयश्री भिवा साठे, २०. सुमन भिवा साठे, २१. श्री. बबन कोंडीबा भोईर, २२. श्री. राजु दत्तु रसाळ
जाब देणार नं. ११ ते २२, रा. केशवनगर, चिंचवड, ता. हवेली पुणे- ४११ ०३३.
२३. श्री. चंद्रकांत शामराव साठे, २४. श्री. नंदु शांताराम साठे, २५. श्री. अविनाश शांताराम साठे
२६. श्री. शंकर नथू तरस, जाब देणार नं. २३ ते २६, रा. गावडे भोईर आळी, चिंचवड, ता. हवेली पुणे- ३३
२७. चंद्रभागा चिपळूण दांगट, २८. कलावती राजाराम दांगट, २९. रामदास नथू तरस
जाव देणार नं. २७ ते २९, रा. विकासनगर, किवळे, ता. हवेली पुणे- ४१२१०१.
३०. मंदा उत्तम वाल्हेकर, जाब देणार नं. ३०, वाल्हेकरवाडी, चिंचवड, ता. हवेली पुणे- ४११ ०३३.
३१. अनिता वसंत घुले, जाब देणार नं. ३१, रा. भोसरी, ता. हवेली पुणे- ४११ ०२६.
३२. विमल रामराव तरस, जाब देणार नं. ३२, रा. वडगाव मावळ, ता. मावळ, पुणे- ४१२ १०६.
३३. रेखा अशोक गाडे, ३४. श्री. सुधिर महादु ढोरे, जाब देणार नं. ३३ व ३४, रा. देहुरोड, ता. हवेली पुणे- ०१
३५. शारदा लक्ष्मण बहिरट, ३६. सुनिता राजेंद्र भोंडवे, ३७. अनिता प्रकाश तरस
जाव देणार नं. ३५ ते ३७, चिंचवड, ता. हवेली पुणे- ४११०३३.
इतर संस्था / जाव देणार नं. ३
३८. दर्शननगरी अ-१ सहकारी गृहरचना, ३९. दर्शननगरी - २ सहकारी गृहरचना ४०. दर्शननगरी अ-३ सहकारी गृहरचना, ४१. दर्शननगरी - ४ सहकारी गृहरचना ४२. दर्शननगरी -५ सहकारी गृहरचना, ४३. दर्शननगरी - ६ सहकारी गृहरचना ४४. दर्शननगरी बी-१ सहकारी गृहरचना, ४५. दर्शननगरी बी - २ सहकारी गृहरचना ४६. दर्शननगरी बी-३ सहकारी गृहरचना, ४७. दर्शननगरी बी - ५ सहकारी गृहरचना ४८. दर्शननगरी बिल्डींग सी सहकारी गृहरचना, ४९. दर्शननगरी बिल्डींग डी सहकारी गृहरचना
पत्ता: स.नं. २९२/१, २९२/२, २९२/३, व स.नं. २९४ / १०, केशवनगर, चिंचवड,
ता. हवेली जि. पुणे- ४११०३३.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये दर्शननगरी बी - ४ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. २९२/१, २९२/२, २९२/३, व स.नं. २९४/१०, केशवनगर, चिंचवड, ता. हवेली जि. पुणे - ४११ ०३३ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४६४ / २०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १९/१२/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे अ‍ॅड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक १ ते ४८ गैरहजर. गैरअर्जदार/ जमिन मालक १ ते ४८ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०९/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक १ ते ४८ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : ०९/०१/२०२५

शिक्का

**सही/-**
**संजय राऊत**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे**

# ग्लॅम वर्ल्ड

## मृणालचं 'स्पिरिट'

'ॲनिमल'सारख्या चित्रपटामुळे हिंदी पट्टयात लोकप्रिय ठरलेला दाक्षिणात्य दिग्दर्शक म्हणजे संदीप रेड्डी वांगा. संदीप प्रभाससोबत नव्या चित्रपटावर काम करत आहे. 'स्पिरिट' असं या चित्रपटाचं नाव असेल. यासाठी प्रभासचं नाव निश्चित असलं तरी अभिनेत्रीचं नाव ठरलेलं नाही. संदीप मृणाल ठाकूरशी चर्चा करत असल्याचं सांगितलं जात आहे. 'स्पिरिट' हा खूपच महत्त्वाकांक्षी चित्रपट असून यात सर्वोत्तम कलाकारांना घेण्याचा संदीपचा प्रयत्न आहे. सैफ अली खान आणि करिना कपूर यांच्याशीही चित्रपटाबाबत बोलणी सुरू आहेत. त्यामुळे आत या चित्रपटात मृणाल झळकणार का, हे पहावं लागेल.




## कमबॅकचे वर्ष

हिंदी-मराठी मालिकाविश्वात यंदा बरंच काही घडलं. या वर्षी अनेक चलतीतल्या मालिकांनी निरोप घेतला. तसंच बऱ्याच कलाकारांनी छोट्या पडद्यावर पुनरागमन केलं. हिंदी मालिकाविश्वात जुन्या मालिका पुन्हा दाखवण्याचा ट्रेंड पहायला मिळाला. टेलिव्हिजन विश्वाविषयी नेहमीच बरंच काही बोललं जातं. ओटीटीमुळे मालिकांना मोठ्या स्पर्धेला सामोरं जावं लागतं. असं असलं तरी अनेक प्रेक्षकांना डेली सोप्स आवडतात. यंदाच्या वर्षात अनेक चलतीतल्या मालिकांनी निरोप घेतला. त्याजागी नव्या मालिका दाखल झाल्या. यंदा अगदी दोन ते तीन महिन्यांमध्ये गाशा गुंडाळणाऱ्या मालिकांची संख्याही बरीच जास्त होती. कमी टीआरपीच्या अभावी या मालिकांना खूप लवकर निरोप घ्यावा लागला. यंदाचं वर्ष गाजलं ते अनेक कलाकारांच्या पुनरागमनाने. मराठी मालिकाविश्वात बऱ्याच कलाकारांनी पुनरागमन केलं. अभिनेता राकेश बापट अनेक वर्षांनी टीव्हीवर दाखल झाला. त्याची 'नवरी मिळे हिटलर'ला ही मालिका चांगलीच गाजते आहे. 'लागीरं झालं जी'नंतर नितिश चव्हाणने ब्रेक घेतला होता. त्याने 'लाखात एक आमचा दादा'मधून छोट्या पडद्यावर पुनरागमन केलं. 'स्वाभिमान : शोध अस्तित्वाचा' या मालिकेनंतर दिशा परदेशी 'लाखात एक आमचा दादा'मध्ये झळकली. सुनिल बर्वेनेही छोट्या पडद्यावर पुनरागमन केले. त्याने 'पारू' या मालिकेत सयाजीरावांची भूमिका साकारली. गेल्या काही वर्षांच्या ब्रेकनंतर मृणाल दुसानीस पुन्हा एकदा अभिनयाकडे वळली तर तब्बल सहा वर्षांनी मयुरी देशमुख मालिकेत झळकली. यंदाचं सर्वात वलयांकित कमबॅक ठरलं ते अशोक सराफ यांचं. 'अशोक मामा' या मालिकेतून ते पुन्हा एकदा छोट्या पडद्याकडे वळले आहेत. ही मालिका लोकांच्या पसंतीस उतरते आहे. सुबोध भावेही यंदा मालिकेत झळकला. हिंदीतही चित्रपटांप्रमाणे रि-रिलिजचा ट्रेंड पहायला मिळाला. 'बडे अच्छे लगते हैं' ही एकेकाळी गाजलेली मालिका पुन्हा प्रदर्शित झाली. या मालिकेला प्राईम टाईम मिळाला. दुसरीकडे 'सीआयडी' ही प्रेक्षकांची लाडकी मालिका नव्या रुपात प्रेक्षकांच्या भेटीला आली. 'रामायण', 'महाभारत' या मालिकाही प्रेक्षकांच्या भेटीला आल्या.



## 'पुष्पा २' सुसाट!

'पुष्पा २' चं वादळ अद्यापही शमलेलं नाही. 'पुष्पा २' हा 'बाहुबली २'च्या कमाईला मागे टाकून भारतात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. दुसरीकडे 'मुफासा : द लायन किंग'ला अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. पहिल्या भागाच्या तुलनेत या दुसऱ्या भागाची सुरूवात काहीशी धीमी झाली आहे. येत्या काळात हा चित्रपट पकड घेणार का, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. २०२४ च्या अखे-रीस सर्वत्र चर्चा सुरू आहे ती 'पुष्पा २' ची. 'पुष्पा २' चं वादळ अद्यापही शमलेलं नाही. ते प्रचंड वेगाने घोंघावताना दिसत आहे. 'पुष्पा २' सातत्याने नवे विक्रम रचत असून भल्याभल्या चित्रपटांच्या कमाईला मागे टाकतो आहे. 'पुष्पा २' ने बॉक्स ऑफिसवर ऐतिहासिक कामगिरी करत 'बाहुबली २' च्या कमाईला मागे टाकलं आहे. 'बाहुबली २' ने भारतीय बॉक्स ऑफिसवर १०३१ कोटी रुपये कमावले होते. तो भारतात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट होता. 'बाहुबली २' ची गेल्या सात वर्षांची मक्तेदारी 'पुष्पा २' ने मोडित काढली असून आता 'पुष्पा २' हा भारतीय बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. 'पुष्पा २' ने फक्त सतरा दिवसात १०४६.७५ कोटी रुपये कमावले आहेत. चित्रपटाच्या कमाईचा आकडा सातत्याने वाढतो आहे. 'बाहुबली २' ने भारतात एक हजार कोटी रुपयांहून अधिक गल्ला जमवल्यानंतर हा विक्रम कोणता चित्रपट मोडीत काढणार, याबाबतची उत्सुकता ताणली गेली होती. तब्बल सात वर्षं अबाधित असणारा हा विक्रम अखेर अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' ने मोडीत काढला. या चित्रपटाने पहिल्या दिवशी १७९.२५ कोटी रुपयांचं जबरदस्त ओपनिंग मिळवलं होतं. पहिल्या आठ दिवसात चित्रपटाने ७३६.३५ कोटी रुपये कमावले. दुसऱ्या आठवड्यात 'पुष्पा २' च्या कमाईत घट झाली. चित्रपटाने २७०.४० कोटी रुपये कमावले. दोन आठवड्यांमध्ये चित्रपटाने १००६.७५ कोटी रुपये कमावले. 'पुष्पा २' ने तिसऱ्या आठवड्याची सुरूवात धडाक्यात केली. सरत्या आठवड्यातल्या शुक्रवारी चित्रपटाने १४ कोटी रुपये कमावले. त्यानंतर शनिवारी हा आकडा २६ कोटी रुपयांवर पोहोचला आणि 'पुष्पा २' ने सर्वोच्च स्थान पटकावलं. 'पुष्पा २' ने भारतात १२०० कोटी रुपयांच्या कमाईचं उद्दिष्ट ठेवलं आहे. आता हे उद्दिष्ट साध्य होणार का, हे येत्या काळात कळेलच. दरम्यान, वर्षाअखेरीस 'मुफासा : द लायन किंग' या चित्रपटाबाबतची प्रचंड उत्सुकता होती. या चित्रपटाच्या पहिल्या भागाने जगभरात चांगली कमाई केली होती. 'द लायन किंग' हा जगातल्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक होता. मात्र 'मुफासा: द लायन किंग'ची सुरूवात पहिल्या भागाशी तुलना करता काहीशी धीमी झाली आहे. 'मुफासा'ने पहिल्या दोन दिवसात २२.७० कोटी रुपये कमावले. दुसरीकडे चित्रपटाच्या पहिल्या भागाने ३०.२१ कोटी रुपयांचा व्यवसाय केला होता. 'मुफासा : द लायन किंग'ला शाहरूख खान, आर्यन खान, अबराम खान, श्रेयस तळपदे यांनी आवाज दिला आहे. मात्र हा चित्रपट पहिल्या भागाच्या तुलनेत फारसा प्रभावी ठरत नसल्याचं सध्याचं चित्र आहे. अमेरिकेतही 'मुफासा'ला कमी प्रतिसाद मिळताना दिसत आहे. त्यामुळे पहिल्या आठवड्यात अपेक्षित कामगिरी करण्यात या चित्रपटाला अपयश येऊ शकतं. पुढच्या काही दिवसात 'मुफासा : द लायन किंग' पकड घेणार का, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.







## अभिनेत्रींनी गाजवलं वर्ष

यंदाचं वर्ष अभिनेत्यांप्रमाणेच अभिनेत्रींचंही ठरलं. अनेक अभिनेत्रींनी चित्रपट गाजवले. त्यांना चांगली लोकप्रियताही मिळाली. गेल्या काही वर्षांपासून हिट चित्रपटाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या अभिनेत्रींसाठीही हे वर्ष चांगलं गेलं. यंदाचं वर्ष गाजवलेल्या काही अभिनेत्रींवर नजर टाकू या. दीपिका पदुकोणसाठी २०२३ हे वर्षही उत्तम गेलं होतं. तिचे 'जवान' आणि 'पठाण' हे दोन्ही चित्रपट तुफान गाजले. या दोन्ही चित्रपटांमध्ये शाहरूख खान प्रमुख भूमिकेत असला तरी दीपिकाच्या अभिनयाचंही खूप कौतुक झालं. यंदाच्या वर्षाच्या सुरूवातीलाच दीपिकाने 'फायटर'च्या रुपात यशस्वी चित्रपट दिला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर २०० कोटी रुपये कमावले. 'फायटर'मध्ये हितिक रोशन प्रमुख भूमिकेत होता. दीपिकानेही त्याच्या तोडीस तोड अभिनय करत वाहवा मिळवली. यासोबतच 'कल्की २८९८ एडी'मध्येही दीपिका झळकली. या चित्रपटाने देशभरात दणकून कमाई केली. शर्वरी वाघचा 'मुंज्या' हा चित्रपट चांगलाच गाजला. 'मुंज्या'ने बॉक्स ऑफिसवर १०० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली. यंदा ती 'वेदा' या चित्रपटातही दिसली. मात्र वेदाला म्हणावं तितकं यश मिळालं नाही. २०२३ मध्ये 'द क्रू'मध्ये प्रभावी भूमिका साकारल्यानंतर क्रिती सेनॉन यंदा 'तेरी बातों ने ऐसा उलझा दिया'मध्ये शाहीद कपूरसोबत दिसली. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बऱ्यापैकी कामगिरी केली. क्रितीच्या 'दो पत्ती'मधल्या अभिनयाचंही कौतुक झालं. 'स्त्री २' मुळे श्रद्धा कपूरचं नशीब फळफळलं. गेल्या काही वर्षांपासून श्रद्धा यशाच्या प्रतिक्षेत होती. यंदा तिला घवघवीत यश मिळालं. करिना कपूर 'सिंघम अगेन'मध्ये चमकली. या चित्रपटाला चांगलं यश मिळालं. विद्या बालन 'भुलभुलैय्या ३' मधून रसिकांसमोर आली. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर २७८ कोटी रुपये कमावले. रश्मिका मंदानाने गेल्या वर्षी 'ॲनिमल'च्या रुपात यशस्वी चित्रपट दिला. गेल्या वर्षाच्या अखेरीस 'ॲनिमल' प्रदर्शित झाला होता. यंदाही वर्षाअखेरीस प्रदर्शित झालेला तिचा 'पुष्पा २' प्रचंड गाजतो आहे. त्यामुळे यंदाचं वर्ष अभिनेत्यांसोबतच अभिनेत्रींनीही गाजवलं असं म्हणायला हरकत नाही.

## येतोय मायराचा नवा चित्रपट

छोटीशी मायरा वायकुळ सध्या मराठी चित्रपट जगतावर राज्य करत असल्याचं दिसून येत आहे. या वर्षात मायराचा 'नाच गं घुमा' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यानंतर आता ती 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटात दिसणार आहे. 'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेतून बालकलाकार मायरा वायकुळ घराघरात पोहोचली. निरागस आणि गोड चेहऱ्याची मायरा प्रेक्षकांना भावली. मायरा अभिनय क्षेत्रात उत्तरोत्तर प्रगती करताना दिसते आहे. मालिकांसोबतच ती चित्रपटांमध्येही झळकते आहे. मायरा 'नाच गं घुमा' या चित्रपटात बाल कलाकार म्हणून झळकली. आता तिचा नवा चित्रपट प्रेक्षकांसच्या भेटीला येणार आहे. 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटातून मायरा रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. या चित्रपटाचं पहिलं पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं. मायरा या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. यात मायरासोबत उषा नाडकर्णी, कल्याणी मुळ्ये, मंगेश देसाई, कमलेश सावंत, सविता मालपेकर, प्रथमेश परब हे कलाकार असतील. मायरासोबत अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ कलाकार असल्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. चित्रपटाच्या पोस्टरमध्ये मायराच्या हातात फुग्याला बांधलेलं पोस्टकार्ड आहे. त्यामुळे मायरा देवबाप्पाला पत्र लिहिणार असल्याचं दिसतंय, आता ती हे पत्र कशासाठी लिहिणार आहे आणि देवबाप्पापर्यंत हे पोस्टर पोहोचणार का, हे मोठ्या पडद्यावरच पहावं लागणार आहे. या चित्रपटात मायराचा अभिनय पाहण्यासही प्रेक्षक उत्सुक आहेत.




## येतोय 'दे दे प्यार दे २'

अजय देवगण आणि रकुलप्रीत सिंगचा 'दे दे प्यार दे' हा चित्रपट चांगलाच गाजला होता. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्याच्या सीक्वेलच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. आता या चित्रपटाचा सीक्वेल येणार आहे. 'दे दे प्यार दे २' च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. पुढील वर्षी नोव्हेंबरमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होईल. अंशुल शर्मा या चित्रपटाचं दिग्दर्शन करणार आहे. अजय आणि रकुलची जोडी रुपेरी पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षकही उत्सुक आहेत.




## ॲली मराठी चित्रपटात!

बॉलिवूड अभिनेत्री ॲली अबराम लवकरच मराठी चित्रपटात दिसणार आहे. इलू इलू या आगामी चित्रपटात ती प्रमुख भूमिकेत दिसेल. या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला. अजिंक्यबापू फाळके चित्रपटाचं दिग्दर्शन करतील. एली या चित्रपटात मिस पिंटो ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. भाषेचं आव्हान असूनही तिने हा चित्रपट स्वीकारला आणि चित्रपटासाठ १०० टक्के योगदान दिलं.



## मौनीचा नवा चित्रपट

अभिनेत्री मौनी रॉय पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर दिसणार आहे. मौनी 'सलाकार' या चित्रपटातून रसिकांसमोर येणार आहे. मौनीने दिग्दर्शक फारुक कबीरसोबतचा एक फोटो पोस्ट केला असून सेटवर आपण आनंदी असल्याचं म्हटलं आहे. २०२५ साठी तयार रहा, असंही तिने म्हटलं आहे. तिने सेटवरचा फोटो शेअर केला आहे. त्यामुळे मौनीचे चाहते खूपच खूष झाले आहेत. या चित्रपटात मौनी कोणत्या भूमिकेत दिसणार याबाबत फारसं काही कळलेलं नाही. चित्रपटात तिच्यासोबत कोण कलाकार आहेत, याचाही खुलासा झालेला नाही. मात्र मौनी नव्या चित्रपटात दिसणार असल्यामुळे तिचे चाहते मात्र खूश आहेत.





"जसप्रीत बुमराहच्या पाठीला दुखापत आहे. तो स्कॅनसाठी गेला होता. वैद्यकीय पथक त्याच्यावर लक्ष ठेवून आहे आणि स्कॅनचा निकाल आल्यावर पुढील गोष्टी आम्हाला कळतील."
— प्रसिध कृष्णा

'हा निवृत्तीचा निर्णय नव्हता. मी फक्त या सामन्यातून माघार घेतली. मी नंतर खेळणारच नाही असं नाही. आत्ता धावा होत नाहीयेत, पण याची काय खात्री की ४-६ महिन्यांनी धावा होणार नाहीत?
— रोहित शर्मा



# ऋषभ पंतचे वादळी अर्धशतक

## भारत ऑस्ट्रेलियापेक्षा १४५ धावांनी पुढे : सिराजचा भेदक मारा






■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सिडनी :** बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या ५व्या कसोटीत भारत ऑस्ट्रेलियापेक्षा १४५ धावांनी पुढे आहे. शनिवारी दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत संघाने ६ गडी गमावून १४१ धावा केल्या होत्या. रवींद्र जडेजा ८ धावांवर आणि वॉशिंग्टन सुंदर ६ धावांवर नाबाद माघारी परतले.

भारतीय संघाकडून ऋषभ पंतने सिडनीमध्ये ३३ चेंडूत ६१ धावा केल्या. यशस्वी जैस्वालने २२ धावांचे योगदान दिले. केएल राहुल आणि शुभमन गिल १३-१३ धावा करू शकले. विराट कोहलीने ६ धावा केल्या. स्कॉट बोलंडने ४ बळी घेतले.

चहापानाच्या विश्रांतीपूर्वी ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या डावात १८१ धावांवर सर्वबाद झाला होता. येथे भारताकडे पहिल्या डावात ४ धावांची आघाडी होती. भारताने पहिल्या डावात १८५ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाकडून पदार्पण सामना खेळत असलेल्या ब्यू वेबस्टरने सर्वाधिक ५७ धावा केल्या. स्टीव्ह स्मिथने ३३ आणि सॅम कोन्स्टासने २३ धावा केल्या. प्रसिध कृष्णा आणि मोहम्मद सिराजने प्रत्येकी ३ बळी घेतले. जसप्रीत बुमराह आणि नितीश रेड्डी यांनी २-२ विकेट घेतल्या.



"ज्या खेळपट्टीवर बहुतेक फलंदाजांनी ५० किंवा त्यापेक्षा कमी स्ट्राईक रेटने फलंदाजी केली, अशात पंतने १८४ च्या स्ट्राईक रेटने खेळलेली खेळी खरोखरच उल्लेखनीय आहे. त्याने पहिल्या चेंडूपासून ऑस्ट्रेलियाला हैराण केले. त्याची फलंदाजी पाहणे मनोरंजक असते. प्रभावी खेळी!"
— सचिन तेंडुलकर



रोहित शर्माच्या जवळ मी असतो, तर त्याला एकच सल्ला दिला असता... मैदानावर जा आणि बिनधास्तपणे फटकेबाजी कर, ज्या पद्धतीत तू आत्ता खेळत आहेस त्यातून तुझ्या धावा होणार नाहीत. आक्रमक फलंदाजी केल्यावर काय घडते ते पाहूया.
— रवि शास्त्री
माजी कोच, भारत

## ऑस्ट्रेलियाचा रडीचा डाव; बुमराहवर बॉल टॅम्परिंगचा आरोप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सिडनी :** सिडनी कसोटीत ऑस्ट्रेलियाच्या डावादरम्यान भारतीय कर्णधार जसप्रीत बुमराहला अचानक बाहेर बोलावण्यात आले. भारताचा प्रमुख गोलंदाज बाहेर गेल्यामुळे भारतीय चाहत्यांना धक्का बसला. पण इतर गोलंदाजांनी उल्लेखनीय कामगिरी करत ऑस्ट्रेलियाचा डावा स्वस्तात गुंडाळला. बुमराहला दुखापत झाल्यामुळे त्याला हॉस्पिटलमध्ये स्कॅन करण्यासाठी नेण्यात आले होते. पण ऑस्ट्रेलियन चाहत्यांनी बुमराहवर बॉल टॅम्परिंगचा आरोप केला आहे. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

फिझीओ टीमसह मैदाबाहेर गेलेल्या बुमराहला, जर्सी चेंज करून कारमधून हॉस्पिटलमध्ये जाताना आपण पाहिले. त्यानंतर काही वेळाने बुमराह हॉस्पिटलमधून सिडनी ड्रेसिंग रूममध्ये परतला. भारतीय वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने बुमराहला पाठीचे दुखणे उद्भल्यामुळे, स्कॅन करण्यासाठी हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्यात आले होते, असे सांगितले.

## कविश भट्टड, हियान रेड्डी, मंतिक अय्यर, निवान खेळाडू आघाडीवर



**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या आयोजित पीडीसीसी ७,९,११ वर्षाखालील मुले व मुली निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत कविश भट्टड, हियान रेड्डी, मंतिक अय्यर, निवान अगरवाल, रिजुल कुऱ्हाडे, समायरा थोरात, प्रितिका नंदी, अन्वी हिंगे, शालवी चास्कर या खेळाडूंनी आपापल्या गटात आघाडी प्राप्त करत आजचा दिवस गाजवला. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हॉल, पुणे सातारा रोड येथे सुरू असलेल्या ट्रूस्पेस यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभलेल्या रॅविक्टरी प्लास्टिक प्रायव्हेट लिमिटेड व युनिलिव्हर यांचे सह प्रायोजकत्व लाभलेल्या या स्पर्धेत ७ वर्षाखालील खुल्या गटात पाचव्या फेरीत कविश भट्टडने निश्र्वंथ रामकुमारला पराभुत करून ५ गुण मिळवले. ९ वर्षाखालील खुल्या गटात पहिल्या पटावर हियान रेड्डीने विहान शहाचा, तर दुसऱ्या पटावर मंतिक अय्यरने आयुश जगतापचा पराभव करून ५ गुण प्राप्त केले. निवान अगरवालने शौर्य सोनावणेवर विजय मिळवत ५ गुण मिळवले. ११ वर्षाखालील गटात रिजुल कुऱ्हाडेने ईशान अर्जुन पीवाय याचा पराभव करून ५ गुणांची कमाई केली. ७ वर्षाखालील मुलींच्या गटात चौथ्या फेरीत पहिल्या पटावरील लढतीत समायरा थोरातने वेदिका मदनेचा पराभव करून ४ गुण मिळवले. प्रितिका नंदीने रेवा सोंडकरचा पराभव करून ४ गुणांची कमाई केली. ९ वर्षाखालील मुलीच्या गटात अन्वी हिंगेने चार्वी पलरेचाचा पराभव करून ४ गुणांसह आघाडी मिळवली. ११ वर्षाखालील मुलींच्या गटात शालवी चास्करने निधी खिंवसराचा पराभव करून ४ गुण मिळवले. याआधी स्पर्धेचे उद्घाटन रॅविक्टरी प्लास्टिक प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक सोहन फडके, पीडीसीसीचे उपाध्यक्ष व ट्रूस्पेसचे संचालक अश्विन त्रिमल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे, चीफ आरबीटर अथर्व गोडबोले, डेप्युटी चीफ आरबीटर श्रद्धा विंचवेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## विदर्भाचा बादफेरीतील प्रवेश निश्चित; नचिकेत, यश चमकले



**नवी दिल्ली :** मध्यमगती गोलंदाज नचिकेत भुतेच्या अचूक माऱ्यानंतर शतकवीर यश राठोड व करुण नायरने केलेल्या द्विशतकी भागीदारीच्या बळावर विदर्भाने पाचव्या साखळी सामन्यात उत्तरप्रदेशचा आठ गड्यांनी धुव्वा उडवून विजय हजारे करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत सलग पाचवा विजय नोंदविला. या विजयासोबतच विदर्भाने बादफेरीतील स्थानही पक्के केले आहे. विशाखापट्टणम येथे उत्तरप्रदेशने निर्धारित ५० षटकांत ८ बाद ३०७ अशी मजबूत धावसंख्या उभारली. समीर रिझवीने विदर्भाविरुद्ध पुन्हा एकदा शतकी डाव खेळत पाच चौकार व सात षटकारांच्या मदतीने ८२ चेंडूंत १०५ धावा ठोकल्या. याशिवाय माधव कौशिकने ६६ चेंडूंत ४१, प्रियम गर्गने ३४, शिवम मावीने २० चेंडूंत नाबाद ३३, अभिषेक गोस्वामीने ३२ व आर्यन जुयालने २३ धावांचे योगदान दिले. विदर्भाकडून मध्यमगती गोलंदाज भुतेने ६५ धावांत चार गडी बाद केले. तर गेल्या सामन्यात सहा गडी बाद करणाऱ्या दर्शन नळकांडेने ६१ धावांत दोन बळी टिपले. तसेच फिरकीपटू हर्ष दुबे व पार्थ रेखडेने एकेक फलंदाज बाद केला. विदर्भाने ३०८ धावांचे विशाल विजयी लक्ष्य ४७.२ षटकांत केवळ दोन गडी गमावून सहज गाठले. राठोडने १५ चौकार व एका षटकारासह १४० चेंडूंत नाबाद १३८ धावा ठोकल्या, तर अन्य शतकवीर करुणने ११ चौकार व दोन षटकारांच्या मदतीने १०१ चेंडूंत ११२ धावा काढल्या.

### १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत

## ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमीची धडाकेबाज सुरुवात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चॅम्प्स करंडक १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत रीतम सेन(नाबाद ५१ धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाने लाईफ फिट क्रिकेट अकादमीचा १० गडी राखून पराभव करत धडाकेबाज सुरुवात केली.

धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी व स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना लाईफ फिट क्रिकेट अकादमी संघाने २५ षटकात ५ बाद ११३ धावा केल्या. यात यश दराडे ४७, आरीन सातपुते २१, आर्य आंबेकर १८ यांनी धावा केल्या. ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमीकडून स्वराज मोरे (२-१७), फैज पटेल (१-१२) यांनी अचूक गोलंदाजी करत प्रतिस्पर्धी संघाला मोठे आव्हान उभारण्यापासून रोखले.



हे आव्हान ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाने १४.२ षटकात बिनबाद ११५ धावा करून पूर्ण केले. यात रीतम सेनने ४२ चेंडूत ७ चौकाराच्या मदतीने नाबाद ५१ धावा, स्वर नागवडेने ३५ चेंडूत ३ चौकारासह नाबाद ३७ धावा केल्या. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ६३ चेंडूत १०० धावांची भागीदारी करून संघाला विजय मिळवून दिला.

### खो खो विश्वचषक २०२५ नेत्रदीपक चषक : दिनांक १३ जानेवारीपासून प्रारंभ

## 'शुभंकर''तेजस' आणि 'तारा' च्या अनावरणाने उत्कंठा शिगेला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दि इम्पीरियल हॉटेल, जनपथ येथे आयोजित करण्यात आलेल्या शानदार सोहळ्यात आगामी पहिल्या खो खो विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदाचे चषकाचे अनावरण करण्यात आले. भारतीय खो खो महासंघातर्फे (के के एफ आय) आणि भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) मान्यतेने होणाऱ्या या स्पर्धेचा प्रारंभ दिनांक १३ जानेवारी रोजी होत आहे. चषकाबरोबरच स्पर्धेच्या 'तेजस' आणि 'तारा' या शुभंकरांचेही अनावरण करण्यात आले

नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये होणाऱ्या या स्पर्धेतील पुरुष गटात २१ तर महिला गटात २० संघांचा समावेश आहे. सहा खंडांमधील २४ देशां मधून हे संघ आल्यामुळे खऱ्या अर्थाने हा खेळ जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे असेच म्हणावे लागेल.



पुरुष गटासाठी निळ्या रंगाचा आणि महिलांसाठी हिरव्या रंगाचा चषक दिला जाणार आहे हे दोन्ही चषक त्यांच्या समकालीन नक्षीद्वारे खो खोच्या गतिमान भावनेला मूर्त रूप देतात, ज्यामध्ये प्रवाही वक्र आणि सोनेरी आकृत्या आहेत. निळ्या रंगाचा चषक विश्वास, दृढनिश्चय आणि सार्वत्रिक अपील यांचे प्रतीक आहे, तर हिरव्या रंगाचा चषक प्रगती आणि चैतन्य दर्शवते. हे चषक म्हणजे स्पर्धेच्या सर्वोच्च स्तरावर मागणी केलेल्या अचूकतेचे आणि उत्कृष्टतेचे प्रतीक आहे.

महासंघाने या स्पर्धेसाठी अधिकृत शुभंकर म्हणून काम करणाऱ्या हरीणांची गतिशील जोडी 'तेजस' आणि 'तारा' देखील अभिमानाने सादर केली. हे शुभंकर वेग, चपळता आणि सांघिक कार्य या खेळाच्या मुख्य गुणधर्मांना मूर्त रूप देतात. तेजस हा तेज आणि उर्जेचे प्रतीक आणि तारा हे मार्गदर्शन आणि आकांक्षेचे प्रतिनिधीत्व करणारी, पारंपारिक भारतीय आकृतिबंधांनी सजलेल्या दोलायमान निळ्या आणि केशरी खेळाच्या पोशाखात चित्रित केले आहे, खेळाचा वारसा आणि त्याचे आधुनिक आकर्षण या दोन्हींचा उत्सव साजरा करतात. हासंघाने स्पर्धेच्या यशाची खात्री करण्यासाठी वेगवेगळ्या संस्थांबरोबर भागीदारी केली आहे. सर्व सहभागींसाठी ट्रॅव्हल लॉजिस्टिक व्यवस्थापित करून, अंमलबजावणी भागीदार म्हणून काम करणार आहे. टीव्ही ब्रॉडकास्ट पार्टनर म्हणून स्टार स्पोर्ट्स नेटवर्क आणि दूरदर्शनच्या माध्यमातून ब्रॉडकास्टची पोहोच वाढवली जाईल, तर डिस्ने+ हॉटस्टार ओटीटी ब्रॉडकास्ट पार्टनर म्हणून काम करेल.

## नवनाथ झांजुर्णे ठरले आयर्न मॅन





**बहरिन :** वेड लागल्याशिवाय इतिहास घडत नाही.' नेमकं याच उक्तीप्रमाणे ६९ वर्षीय मराठमोळ्या नवनाथ झांजुर्णे यांनी सातासमुद्रापार बहरिनमध्ये (मध्य- पूर्व) नुकत्याच झालेल्या 'आयर्न मॅन ७०.३' या स्पर्धेत हिंदुस्थानचा तिरंगा डौलाने फडकावीत 'आयर्न मॅन' किताबावर आपले नाव कोरले. ते आता भारतातील सर्वांत ज्येष्ठ 'आयर्न मॅन' किताबाचे मानकरी ठरले आहेत. 'आयर्न मॅन ७०.३' स्पर्धा म्हणजे एका दमात केलेले १.९ किलोमीटर समुद्रातील स्विमिंग, ८९ किलोमीटर सायकलिंग आणि २१ किलोमीटर धावणे होय. गतवर्षी तुर्कस्तानला झालेल्या याच स्पर्धेतून काही कारणामुळे नवनाथ झांजुर्णे यांना 'आयर्न मॅन' किताबाने हुलकावणी दिली होती.कोरोनापूर्वी नवनाथ झांजुर्णे यांचे वजन ९० किलो होते. त्यांनी तब्बल २५ किलो वजन कमी केले.

## १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धा सुपरजायंट्स इलेव्हन संघांना विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दुसऱ्या 'ए-स्क्वेअर प्रीमिअर लीग १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत रॉयल्स् इलेव्हन आणि सुपरजायंट्स इलेव्हन टीम ने आक्रमक बल्लेबाजी तथा गेंदबाजी का प्रदर्शन करते हुए अपने प्रतिद्वंद्वी टीम को हराकर विजेतेपद मिळवले.



वडगांवशेरी येथील सेंट अरनॉल्ड सेंट्रल स्कूलच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेच्या १४ वर्षाखालील गटामध्ये सोहम राऊत याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर सुपरजायंट्स इलेव्हनने सुपरकिंग्ज इलेव्हनचा ८ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या सुपरकिंग्जने १२७ धावांचे आव्हान उभे केले. हे लक्ष्य सुपरजायंट्स इलेव्हनने १८.४ षटकात पूर्ण केले. सोहम राऊत याने ५० धावा आणि शौर्य तावरे याने नाबाद २५ धावांची खेळी करून संघाला विजय मिळवून दिला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण इन्सीया इंडस्ट्रीजचे संचालक इनामदार आणि सौ. इनामदार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू भाविका अहीरे आणि तिचे पालक तसेच ज्युडीशिअल क्रिकेट क्लबचे अध्यक्ष दिपक शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. विजेता टीम च्या सोहम राऊत ला मैना आफ द मैच खिताब मिळाला.

## दोन फिल्डर्समध्ये जोरदार टक्कर

**ऑस्ट्रेलिया :** ऑस्ट्रेलियामध्ये सुरू असलेल्या बिग बॅश लिगमध्ये पर्थ स्कॉचर्स विरूद्ध सिडनी थंडर सामन्यात थरारक घटना घडली. डेव्हिड वॉर्नरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या सिडनी थंडरच्या खेळाडूंमध्ये टक्कर जोरदार झाली. दोन फिल्डर्स कॅच घेताना एकमेकांवर आदळले. टक्कर होताच दोघही जागेवर पडले. आता दोघांनाही दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे.

डाव्या पायावरील चेंडू फलंदाजने लेगसाईडच्या देशेने हवेत भिरकावला आणि कॅच पकडण्यासाठी आलेल्या डॅनियल सॅम्स आणि कॅमेरॉन बॅनक्रॉफ्ट यांच्यामध्ये नजरचुकीमुळे टक्कर झाली. टक्कर इतक्या जोरात झाली की दोघेही जागीच खाली पडले, दोघांनाही दुखापत झाली असून त्यांना त्वरीत मैदानाबाहेर काढण्यात आले.

## हार्दिक-नताशानंतर आता चहल-धनश्रीचाही घटस्फोट?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गेल्या वर्षी भारताचा अष्टपैलू हार्दिक पांड्या आणि नताशा स्टॅन्कोविच यांच्या घटस्फोटाने सर्वांना धक्का दिला होता. चार वर्षांच्या संसारानंतर त्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला होता. आता त्यानंतर अशी चर्चा आहे की भारताचा फिरकीपटू युझवेंद्र चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा हे देखील घटस्फोट घेऊ शकतात. नजीकच्या काळात घडलेल्या घटनांमुळे याबाबत सध्या चर्चा जोर धरत आहे.



त्यांच्या नात्यात कटूता आल्याचे समजत आहे. काही वर्षापूर्वी २०२२ मध्ये धनश्रीने तिच्या इंस्टाग्राम बायोमधील चहल नाव हटवल्याने त्यांच्या काहीतरी बिनसलं असल्याची चर्चा झाली होती, मात्र त्यानंतरही ते दोघे एकत्र दिसल्याने ही चर्चा फार काळ टिकली नाही. परंतु, आता युझवेंद्र आणि धनश्री या दोघांनीही एकमेकांना इंस्टाग्रामवर अनफॉलो केले आहे. याशिवाय युझवेंद्रने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवरील धनश्री सोबतचे सर्व फोटो डिलिट केले असल्याचे दिसून आले आहे.

### आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्रेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत

## विजय क्रिकेट ॲकॅडमी, ब्रेव्हहार्ट संघ विजयी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्रेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत विजय क्रिकेट ॲकॅडमीने सलग दुसरा तर, ब्रेव्हहार्ट संघाने आपल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू





असलेल्या स्पर्धेत विश्वास कुंभार याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर ब्रेव्हहार्ट संघाने स्केलअप ॲकॅडमी क संघाचा ४० धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या ब्रेव्हहार्ट संघाने १९ षटकामध्ये १६१ धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये प्रशाम गांधी याने ५१ धावांची खेळी केली. याशिवाय कुणालसिंग चौहान याने ३० धावांचे तर, विशाल गव्हाणे याने २३ धावांचे योगदान दिले. याला उत्तर देताना स्केलअप ॲकॅडमीचा डाव १२१ धावांवर मर्यादित राहीला. मानस बेडारकर याने ५१ धावांची खेळी करून एकहाती लढा दिला. ब्रेव्हहार्टकडून विश्वास कुंभार याने १६ धावांमध्ये ४ गडी बाद करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

अमित राठोड याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे विजय ॲकॅडमीने स्केलअप ॲकॅडमीचा ८ गडी राखून पराभव करून सलग दुसरा विजय नोंदविला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या स्केलअप ॲकॅडमी ब संघाचा डाव ६० धावांवर गडगडला. अमित राठोड याने ११ धावात ३ गडी तर, निपुण गायकवाड याने ३ धावांमध्ये ३ गडी बाद करून भेदक गोलंदाजी केली. हे माफक लक्ष्य विजय क्रिकेट ॲकॅडमीने ६.१ षटकात व २ गडी गमावून पूर्ण केले.

## पीवायसी अ, टेनिसनट्स रॉजर, एमडब्ल्यूटीए अ संघांचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना व पुणे मेट्रोपोलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए)तर्फे आयोजित व आयकॉन ग्रुप पुरस्कृत अरुण साने मेमोरियल हौशी टेनिस लीग स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत पीवायसी अ, टेनिसनट्स रॉजर, एमडब्ल्यूटीए अ या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.



पीवायसी हिंदू जिमखाना टेनिस कोर्ट येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत पीवायसी अ संघाने महाराष्ट्र मंडळ १ संघाचा १८-३ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. पीवायसी अ संघाकडून योगेश पंतसचिव, प्रशांत गोसावी, अमित लाटे, केदार देशपांडे, सारंग देवी, तन्मय चोभे यांनी सुरेख कामगिरी केली.

दुसऱ्या लढतीत जयदीप वाकणकर, भूषण जोशी, विवेक खडगे, रोहन देशपांडे यांच्या अफलातून खेळीच्या जोरावर एमडब्ल्यूटीए अ संघाने टेनिसनट्स राफा संघाचा १७-१६ असा संघर्षपूर्ण पराभव केला. संदीप बेलुडी, सलील कुंचूर, रवी कोठारी, अमित किंडो, नितीन सावंत, राहुल कोठारी यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर टेनिसनट्स रॉजर संघाने एमडब्ल्यूटीए क संघाचा १८-२ असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली.

SUNDAY EDGE
पंढरी संचार pandharisanchar.com 05•JANE•2025

# मुंडेंच्या बचावासाठी कराड अटकेची संहिता ?



वाल्मीक कराड यांनी समर्पण केले आणि त्यांची रवानगी आता तुरुंगात झाली असली तरी ते संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी नाहीत ते अजूनही केवळ खंडणी प्रकरणातील आरोपी आहेत, हे येथे महत्त्वाचे आहे. त्यांच्या आत्मसमर्पणाचे घडलेले नाट्यमय घटनाक्रम त्यांचे आणि धनंजय मुंडे यांचे असलेले स्नेहबंध..... आणि त्यांच्या प्रत्येक सुखदुःखात धनंजय मुंडे यांचा असलेला बरोबरीचा वाटा लक्षात घेता कराड यांच्या अटकेची जी काही संहिता लिहिली गेली ती धनंजय मुंडे यांच्या बचावासाठी तर नाही ना? अशी शंका येते.

सर्वपक्षीय आमदारांनी महाराष्ट्र डोक्यावर घेतला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास आणि त्यामध्ये हाय प्रोफाईल गुंडा पुंडांच्या सहभाग यावरून महाराष्ट्राचे राजकारण मोठ्या प्रमाणात ढवळून निघाले आहेत. दुर्दैवाने या सर्व घटनाक्रमाला जातीय कंगोरे लागले. त्यामुळे ओबीसी विरुद्ध मराठा हा संघर्ष या निमित्ताने पुन्हा एकदा तीव्र करण्याचे काही लोकांचे मनसुबे यशस्वी होत आहेत असे दिसते.

या सर्व पार्श्वभूमीवर वाल्मीक कराड यांना अटक झाली असली तरी ती अजूनही हत्येच्या गुन्ह्यांमध्ये झालेली नाही हे समजून घ्यावे लागेल. आज शनिवारी सकाळी यातील एक आरोपी अटक करण्यात आला आहे, त्यामुळे आता पुढील धागेदोरे काय निघतात याबाबतची उत्सुकता आहे. काही झाले तरी वाल्मीक कराड याला कोर्टाच्या आरोपातून सही सलामत बाहेर काढणे हेच सर्वांचे ध्येय असेल असे दिसते.

यामध्ये आपल्या पक्षाला धक्का लागू नये यासाठी अजित पवार सरकारमधील एक मंत्री आणि आपला चहिता धनंजय मुंडे यांची प्रतिमा अशीच राहावी यासाठी देवेंद्र फडणवीस आणि अर्थातच या दोघांच्या पाठीमागे असलेली महायुती सरकारची महाशक्ती धनंजय मुंडे यांना वाचवण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करणार यामध्ये संदेह नाही.

पोलीस प्रशासन हातामध्ये असले की होत्याचे नव्हते आणि नव्हत्याचे होते करू शकतो याची जाण फडणवीस यांना आहे. म्हणूनच गृहमंत्री पदासाठीचा प्रचंड आटापिटा करून त्यांनी ते पद आपल्याकडे अबाधित ठेवले आहे.

वाल्मीक कराड यांना शरण येण्यासाठी जी संहिता लिहिली गेली ती देखील अत्यंत नाट्यपूर्ण अशी आहे तब्बल २३ दिवस एखादा आरोपी सापडत नाही इतके महाराष्ट्र पोलीस ना करते नाहीत... वाल्मीक कराड यांना संरक्षण देण्यात येत होते यावर अजूनही अनेकांचे ठाम मत आहे. परंतु महाराष्ट्रात पेटलेला जनक शोक वेगवेगळे जातीय कंगोरे आणि संतोष देशमुख यांच्या खुणाबद्दल वाढत असलेली सहानुभूती लक्षात घेता हे संरक्षण देणे महागात पडू शकते या विचाराने कदाचित वाल्मीक कराड यांची शरणागती घडवून आणलेली असावी.

परंतु स्वतःहून हजर होणे आणि पोलिसांनी मुस्क्या बांधून त्याला पकडून आणणे यामध्ये बराच फरक आहे. न्यायालयाच्या प्रक्रियेमध्ये देखील आत्मसमर्पण शरणागती याला एका वेगळ्या पद्धतीने पाहिले जाते. कदाचित पुढील न्यायालयीन निवाड्याच्या प्रक्रियेमध्ये वाल्मीक कराड याची शरणागती हे त्यांचे एक मोठे शक्ती स्थळ ठरू शकते. मुख्यमंत्री महोदय हे कितीही आरोपीला फासा वर लटकवण्याची भाषा करीत असले तरी वाल्मीक कराड याला अजूनही हत्येच्या गुन्ह्यामध्ये आरोपी करण्यात आलेले नाही त्यामुळे हे संपूर्ण प्रकरण संशयाच्या भवऱ्यामध्ये आहे.

कराड यांना जेथे ठेवले आहे येथे पाच नवीन बेडची ऑर्डर दिली त्यावरून देखील बराच हलक्या उडाला परंतु या बेडची व्यवस्था कराड यांच्याकरिता नाही तर तेथे संरक्षणार्थ नेमण्यात आलेल्या नव्या पोलीस कॉन्स्टेबलसाठी ही व्यवस्था असल्याचे गृहमंत्र्यांनी स्पष्ट केल्यानंतर यावर पडदा पडला.

### तेली यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक

देशमुख यांच्या गेल्या वर्षी नऊ डिसेंबरला झालेल्या निर्घृण हत्येचा तपास करण्यासाठी राज्य सरकारने बुधवारी आयपीएस अधिकारी बसवराज तेली यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले. तेली हे 'सीआयडी'च्या आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख आहेत. 'एसआयटी'मधील सर्व अधिकारी बीड जिल्ह्यातील आहेत. सध्याचे तपास अधिकारी पोलिस उपअधीक्षक अनिल गुजर हेही तपास पथकात असतील. गुजर यांच्याशिवाय 'एसआयटी'च्या इतर सदस्यांमध्ये विजयसिंह शिवलाल जोनवाल, महेश विघ्ने, आनंद शंकर शिंदे, तुळशीराम जगताप, मनोज राजेंद्र वाघ, चंद्रकांत एस. काळकुटे, बाळासाहेब देविदास आखाबरे, भगवानराव गिते यांचा त्यात समावेश आहे. हे बीडमधील असल्याने तपासाच्या निष्पक्षपातीपणाबाबत संशय घेतला जात आहे.



एडिटर चॉईस
अनिरुद्ध बडवे
पंढरी संचार

### तपासाच्या वेळी सोंग

पोलिसांनी बेड्या ठोकल्यानंतर वाल्मिकने तुरुंगातल्या पहिल्याच रात्री अनेक सोंगे केली. वाल्मिकने रात्रभरात जेवण केले नाही. पुढचे चौदा दिवस कोठडीतून सुटका नसल्याने वाल्मिक कोठडीतून बाहेर पडण्यासाठी पळवाटा शोधू लागला आहे. आजारी असल्याचे सांगून हॉस्पिटलमध्ये दाखल होण्यासाठी वाल्मिक आता धडपड करू लागल्याची चर्चा आहे. त्यासाठी त्याने काही सोंगे घेतल्याचा दावाही करण्यात येत आहे. सकाळी नाश्ता करण्यासही वाल्मिकने नकार दिला. पोलिसांच्या आग्रहानंतर वाल्मिकने आर्धी पोळी खाल्ली. मधुमेह आणि रक्तदाबाचा त्रास असल्याने वाल्मिकवर औषधोपचार सुरू आहेत. वाल्मिक कराडला तात्पुरते ऑक्सिजन कीट लावण्यात आले.

### आजारी पडण्यासाठी धडपड

आजारी पडल्यास वाल्मिकला कोठडीऐवजी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले जाऊ शकते. त्यामुळे आपण आजारी कसे पडू यासाठी वाल्मिकची धडपड सुरू आहे. तब्येत ढासळल्यास रुग्णालयात जायला मिळेल आणि चौकशीपासून लांब पळता येईल यासाठी सगळे काही सुरू आहे. आजारी आरोपीची चौकशी करताना तपास अधिकारीही काहीसे सौम्य वागतात. शिवाय चौकशीचे कठोर उपाय करण्यात मर्यादा येतात. चौकशी होऊच द्यायची नाही यासाठी वाल्मिकने आजारपणाचा फंडा निवडला असावा. 'सीआयडी' कोठडीत चौकशीचे खास ठेवणीतले उपाय केले जातात. तो प्रयोग होऊ नये म्हणून वाल्मिक आधीच आजारी पडल्याचे सोंग घेऊ शकतो. वाल्मिकला रक्तदाब आणि मधुमेह आहे. त्यामुळे तपास अधिकारी अधिक कठोर वागणार नाही असे वाल्मिकला वाटू शकते. एकूणच प्रत्येक सुखदुःखात धनंजय मुंडे यांचा असलेला बरोबरीचा वाटा लक्षात घेता कराड यांच्या अटकेची जी काही संहिता लिहिली गेली ती धनंजय मुंडे यांचां बचाव करण्यासाठी तर नाही ना ? अशी शंका येते.

### घटना क्रम- कसा झाला सरेंडर

- वाल्मीक कराड पुण्यात सरेंडर करणार काही दिवसांपासून चर्चा होते. त्यानंतर ३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी सात वाजल्यापासून वाल्मीक कराडचे कार्यकर्ते पुण्यातील सीआयडीच्या कार्यालयाबाहेर एकत्र जमण्यास सुरुवात झाली.

**सकाळी ९ वाजता**
- सकाळी ९ नंतर मोठ्याप्रमाणात गर्दीच्या वातावरणात सीआयडी ऑफिस बाहेर पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता.

**सकाळी १० वाजता**
- पुणे शहर पोलीस दलातील गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे आणि परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीप गिल यांनी देखील सीआयडी कार्यालयाबाहेरील सुरक्षेचा आढावा घेतला.

**सकाळी ११ वाजता**
- वाल्मीक कराड बाराच्या दरम्यान सीआयडी कार्यालयात दाखल होणार अशी माहिती समोर आली.

**दुपारी १२ वाजता**
- पुणे सी आय डी कडे सरेंडर करणार असल्याचे स्वतः वाल्मीक कराड याने व्हिडिओ शेयर केला.

**दुपारी १२. १५ वाजता**
- MH23 BG 2231 स्कॉर्पिओ या वाहनातून चेहरा लपवत वाल्मीक कराड सी आय डी ऑफिस मध्ये दाखल झाला.

**दुपारी १ वाजता**
- सी आय डी चे अतिरिक्त पोलीस महासंचालक प्रशांत बुरडे यांच्याकडून वाल्मीक कराडची चौकशी सुरु झाली.

# 'द्विध्रुवीय पद्धतीकडे भारतीय लोकशाही'

**भारतात आत्ताच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आणि नुकत्याच महाराष्ट्रात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतही आपल्या लोकशाहीची वाटचाल ही द्विध्रुवीय म्हणजेच द्विपक्षीय पद्धतीकडे चालल्याचे लक्षात येते. या दृष्टीनेही महाराष्ट्रातील आत्ताची विधानसभा निवडणूक प्रातिनिधिक उदाहरण ठरावी. १९८९ मध्ये व्ही पी सिंग यांचे जनता दल सत्तेवर आले. अर्थातच स्वतः व्ही पी सिंग आणि जनता दलातील त्यांचे कित्येक सहकारी काँग्रेस मधून फुटूनच बाहेर आलेले होते, त्यांना भारतीय जनता पक्षाने आणि कम्युनिस्ट पक्षाने बाहेरून पाठिंबा दिला होता.'नॅशनल फ्रंट'हे या आघाडीचे नाव होते. परत १९९१ चा अपवाद वगळल्यास, १९९६ आणि १९९८ मध्ये काँग्रेसविरोधी सरकार सत्तेवर आले. येथून खरा भारतीय लोकशाहीमध्ये द्विध्रुवीय पद्धतीचा विकास सुरू झाला.**

आपल्या लोकशाहीचे मॉडेल हे इंग्लंडच्या वेस्टमिंस्टर पद्धतीप्रमाणे, म्हणजेच संसदीय लोकशाहीवर आधारलेले आहे. बऱ्याचशा इतर कॉमनवेल्थ देशांमध्येही लोकशाहीची हीच पद्धत दिसून येते. अर्थातच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच त्याला पूर्ण लोकशाहीचे स्वरूप प्राप्त झाले. बऱ्याच प्रगत देशांमध्ये, मुख्यतः इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये फक्त दोन मुख्य पक्षांमध्येच निवडणूक लढवली जाते. इंग्लंडमध्ये कॉन्सरव्हेटिव्ह पक्ष आणि लेबर पक्ष (म्हणजेच लिबरल पक्ष) असे दोनच मुख्य पक्ष आहेत. अमेरिकेतही रिपब्लिकन पक्ष आणि डेमोक्रेट पक्ष हे मुख्य पक्ष आहेत. आत्ताच पार पडलेल्या तेथील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत या दोन पक्षांमध्ये ९९% मते विभागली गेलीत. तर इतर दोन उमेदवारांना प्रत्येकी अर्धा टक्का एवढीच मते मिळाली. भारतात आत्ताच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आणि नुकत्याच महाराष्ट्रात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतही आपल्या लोकशाहीची वाटचाल ही द्विध्रुवीय म्हणजेच द्विपक्षीय पद्धतीकडे चालल्याचे लक्षात येते. या दृष्टीनेही महाराष्ट्रातील आत्ताची विधानसभा निवडणूक प्रातिनिधिक उदाहरण ठरावी.

आपल्या लोकशाहीचा आलेख सुरुवातीपासून बघितल्यास आपली लोकशाही बळकट आणि प्रगल्भ होत असल्याचे लक्षात येते. आधी १९५१-५२ च्या निवडणुकीत १७.३ कोटी नोंदणीकृत मतदार होते, ते २०२४च्या निवडणुकीपर्यंत ९६.८८ कोटी पर्यंत पोहोचले, याचबरोबर त्यावेळी फक्त ५३ राजकीय पक्ष अस्तित्वात होते, ही संख्या वाढून २०१४ च्या निवडणुकीपर्यंत ४५६ राजकीय पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचे बघायला मिळते. भारताच्या निवडणूक आयोगाकडे साधारणपणे १९०० राजकीय पक्षांची अधिकृत नोंद आहे.

त्यामानाने मग निवडणुकीच्या रिंगणात उतरणारे राजकीय पक्ष साधारण त्याच्या २५% एवढेच आहेत त्यातही मुख्य लढत ही मागील निवडणुकीमध्ये मुख्य दोन आघाड्यांमध्येच झाली. भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए )आणि काँग्रेस प्रणित (आय एन डी आय )इंडी अलायन्स पूर्वी ही आघाडी संयुक्त प्रगतिशील आघाडी म्हणजेच युपीए म्हणून अस्तित्वात होती २०१४च्या निवडणुकीमध्ये ३४२ जागा या एकट्या भाजप आणि काँग्रेस या दोन मुख्य राष्ट्रीय पक्षांमध्येच विभागल्या होत्या उर्वरित १७६ जागा क्षेत्रीय दलांमध्ये विभागल्या गेल्या होत्या. निवडणुकीच्या रिंगणात मात्र तब्बल ४६५ पक्ष २०१४ मध्ये उतरले होते. भारतीय निवडणुकीच्या इतिहासात पहिल्यांदा शंभर राजकीय पक्ष १९८९ च्या निवडणुकीत मतदारांना सामोरे गेलेत. परंतु निकालानंतर मुख्यतः जनता दल, काँग्रेस पक्ष, भाजप आणि कम्युनिस्ट पक्षांची आघाडी याच चार पक्षांमध्ये सर्व जागांचे निकाल सामावून गेले. भारतीय निवडणुकांचा इतिहास बघितल्यास १९५२ आणि त्यानंतरच्या १९५७ च्या निवडणुकीमध्ये काँग्रेस हाच एकमेव प्रबळ पक्ष होता आणि पर्यायाने सत्ताधारी पक्ष होता त्यावेळी विरोधी बाकांवर प्रजा समाजवादी पक्ष स्वराज्य पक्ष आणि जनसंघ यासारखे तुलनेने दुर्बळ राजकीय पक्ष होते साधारण १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत असेच चित्र असायचे. पहिल्यांदा १९७७ मध्ये इंदिरा गांधी यांच्या आणीबाणीच्या निर्णयाला झालेल्या सार्वत्रिक रोषामुळे एक आंदोलन उभे राहिले आणि यातून सर्व विरोधी पक्षांतर्फे जनता पार्टीची स्थापना करण्यात येऊन, ती पार्टी सत्तारूढ झाली.



राजकीय
प्रितीश पंडित
पंढरी संचार

महाराष्ट्राच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमुळे ही द्विद्रय पद्धती आणखीन बळकट झाल्याचे लक्षात येते महाराष्ट्रात यावेळी महायुती म्हणून भाजप सहकारी पक्षांच्या आघाडीमध्ये इतरही लहान लहान पक्ष समाविष्ट होते त्याचबरोबर महाआघाडीमध्ये काँग्रेस शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना बरोबर इतरही अनेक पक्ष समाविष्ट होते त्याचबरोबर प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे प्रबळ राजकीय पक्ष मैदानात होते. परंतु महायुती आणि महाआघाडीच्या लढतीत या दुसऱ्या दोन्ही पक्षांचा बोजवारा उडालेला दिसला. अशा प्रकारे महाराष्ट्रामध्ये ही द्विध्रुवीय पद्धती रुजल्याचे लक्षात आले.मागील लोकसभा निवडणुकीतही महाराष्ट्रात हेच चित्र होते. म्हणूनच भारतीय लोकशाहीची वाटचाल ही 'द्विपक्षीय पद्धतीकडे 'होत आहे असे म्हणायला पूर्णतः वाव आहे.



- भारताच्या संसदीय इतिहासात पहिल्यांदा काँग्रेस व्यतिरिक्त दुसरे ध्रुव अस्तित्वात आले पण लवकरच जनता पार्टीची शकले उडाल्याने झालेल्या मध्यावधी निवडणुकीत परत एकदा काँग्रेस पक्ष इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आला. १९८९ ची निवडणूक ही द्विध्रुवीय पद्धतीचा विचार करताना प्रातिनिधीक ठरली.

### लोकशाहीत द्विध्रुवीय पद्धत

- १९८९ मध्ये व्ही पी सिंग यांचे जनता दल सत्तेवर आले. अर्थातच स्वतः व्ही पी सिंग आणि जनता दलातील त्यांचे कित्येक सहकारी काँग्रेस मधून फुटूनच बाहेर आलेले होते, त्यांना भारतीय जनता पक्षाने आणि कम्युनिस्ट पक्षाने बाहेरून पाठिंबा दिला होता. परत १९९१ चा अपवाद वगळल्यास, १९९६ आणि १९९८ मध्ये काँग्रेसविरोधी सरकार सत्तेवर आले. येथून खरा भारतीय लोकशाहीमध्ये द्वीध्रुवीय पद्धतीचा विकास सुरू झाला. १९९६मधील वाजपेयींच्या १३ दिवसांच्या सरकारनंतर, सत्तेवर आलेले सरकार 'युनायटेड फ्रंटचे' सरकार होते. पंतप्रधानपदी जनता दलाचे एच डी देवेगौडा हे होते. भारतीय जनता पक्ष विरोधी पक्ष होता. हे सरकार गडगडल्याने, पुढे इंद्रकुमार गुजराल हे पंतप्रधानपदी आले. त्यांना काँग्रेस बरोबरच कम्युनिस्ट पक्षाचा पाठिंबा होता. अर्थातच आधीच्या नॅशनल फ्रंट आणि १९९६ च्या युनायटेड फ्रंट मध्ये काँग्रेसमधील फुटीर मंडळींचा भरणा जास्त होता. त्यावेळी जी. के. मूपमार यांची तामिळ मनिला काँग्रेस आणि अशा कित्येक पूर्वाश्रमीच्या काँग्रेसच्या नेत्यांचा सरकारमध्ये भरणा असायचा. १९९८ च्या निवडणुकीनंतर पहिल्यांदा खऱ्या अर्थाने काँग्रेसेतर सरकार, अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात आले. या सरकारला तब्बल ३२ राजकीय पक्षांचा पाठिंबा असल्याने, त्याला 'नॅशनल डेमोक्रॅटिव्ह अलायन्स' चे सरकार म्हटले गेले. १९९९ मध्ये परत निवडणूक झाल्याने, एनडीए चेच, हेच सरकार सत्तारूढ झाले. २००४च्या निवडणुकीमध्ये मात्र परत काँग्रेस हाच सर्वात मोठा पक्ष ठरला आणि भाजप द्वितीय क्रमांकाचा पक्ष ठरल्याने काँग्रेस प्रणित आघाडी सत्तेवर आली आणि त्यांनी 'युपीए' हे नामाभिधान घेतले. २००९ मध्येही यूपीए चीच सत्ता कायम राहिली. त्यानंतर मात्र भारतात एनडीए आणि युपीए यामध्येच मुख्य लढती होतात. यातील घटक पक्ष कधी इकडे तर कधी तिकडे होऊनही इंडी आघाडी आणि भाजपप्रणित एनडीए 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' यामध्येच मुख्य लढत होते, राज्य राज्यांमध्येही साधारण असेच चित्र आहे.